# प्रमिला

(धरती - आकाशावरील काव्यसंग्रह)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**प्रमिला** (धरती - आकाशावरील काव्यसंग्रह)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : माघ कृ. १२, शके १९४५,
गुरुवार, दि. ७ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-971022-9-5

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

# समर्पण

आधाराची माया ही धरती व कणखर
पाठिंब्याच्या आकाशालाच समर्पित !

# मनोगत

पंचमहाभुतातील ही दोन भूतं धरती व आकाश होतं. या धरतीची नानाविध रूपं न्याहाळतं मनाला सुख लाभत जातं तर आकाशाच्या छत्रछायेखाली जगण्याला मोठं क्षितिज मिळतं. आकाशाचेही रंग निरनिराळे, छटा रंगमिश्रित, त्यातले मेघ म्हणजे आकाश व धरतीच्या प्रीतीचे झरेच जणू. ते बरसतात आणि भूमी हसते, डुलते, उमलते, फुलते.

आकाशाच्या त्रिसंध्याकालीन रूपावर ती भाळते, तिच्या हिरव्याकंच लोभस सौंदर्यावर तो फिदा होऊन जातो. नुसते आकाश, नुसती धरित्री हेही स्वतंत्रपणे कवितेच्या विषयात सजून धजून बसतात आणि रसिकांच्या हृदयाचा ठाव घेऊ लागतात.

हे मला भावलेले आकाश, ही मला जाणवलेली वसुंधरा रसिकांचरणी सादर समर्पित !

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


१) उधळण रंगांची ... ७
२) नितळ आभाळी ... ८
३) धरती आली वयात बाई... १०
४) ताज्या गवताचा शेला ... ११
५) पानापानात हिरवा पिवळा...१२
६) अंथरला गं गालिचा ... १३
७) काळा सावळा हा श्याम... १४
८) गेली नभात नारळी ... १५
९) रंग पसरले ... १६
१०) उगवतीच्या शुभरंगांनो ... १७
११) ढगाढगांचा गालिचा ... १८
१२) वारा घोंगावतो आहे ... १९
१३) वर आकाश दुस्तर ... २०
१४) निळ्या जांभळ्या क्षितिजाशी ... २१
१५) गुलबक्षी रंग हा हसतो ... २२
१६) निळ्या हिरव्या पिवळ्या... २४
१५) ऋतू भुईवर ... २६
१८) धुकाळलेली ही सकाळ... २७
१९) आभाळमाया ... २८
२०) एक आपलं आकाश ... २९
२१) आज नभी लाजली ही उषा ... ३०
२२) घरटे छोटे असे एकटे ... ३१
२३) दुःख बोलके वसुंधरेचे ... ३२
२४) नभ मोकळे झालेले ... ३३
२५) चंद्राआडचं आभाळ ... ३४
२६) अशी कांती तेजाळली ... ३६
२७) अशी सफर बघ आयुष्याची ... ३७
२८) सुन्न मनाची विषण्ण दारे... ३८
२९) गंध जगण्याचा यावा ... ३९
३०) जाई न जाई कधीही ... ४०
३१) सर वळवाची होय ... ४१
३२) सर्ग निसर्ग हासरा ... ४२
३३) मन पाऊस पांघरी ... ४३
३४) निळी मदमस्ती ... ४४
३५) सर थेंब मोतीयाची ... ४५
३६) हिरवं तारुण्य ... ४६
३७) थेंबराण्या पावसाच्या ... ४७
३८) पुन्हा गुंतलो थेंबांमधुनी... ४८
३९) हिरवी गाणी हिरव्या ऋतूची ... ४९
४०) भुई अंकुरत आहे ... ५०
४१) दिवा होऊन जगावं ... ५२
४२) कोमल कळी ... ५३
४३) आभाळ भरू येई ... ५४
४४) अन् पंखातून उमेद भरता... ५६
४५) झुंजूमुंजू झालं ... ५७
४६) क्षितिजावरची लालिमा ... ५८
४७) गगनचुंबी वृक्षराजी ... ५९
४८) येता पावसाची सर ... ६०
४९) इंद्रधनू शेतात ... ६२
५१) रत्नमाळ ही ... ६३

५१) धुक्याची चादर आली ... ६४
५२) रान हिरवाई मंदी ... ६६
५३) जीव लागलेत टांगणी ... ६७
५४) पत्र्याच्या छतावरून ... ६८
५५) का असा कोसळतोय ... ७०
५६) मेघ होऊनी दूत बोलल्या ... ७२
५७) दुतर्फा झाडांची दाटी ... ७३
५८) उन्हं पांघरून रान ... ७४
५९) ही बुचाची फुले ... ७५
६०) गवतफुलांशी बोलून आले ... ७६
६१) पृथ्वीवरती स्वर्ग उभारेल ... ७८
६२) हिमगौर पर्वताने ... ७९
६३) आकाशाने भाळावरती ... ८०
६४) भुई झाकली ... ८१
६५) झाडावरती झुंबर ... ८२
६६) वस्त्र धरेचे छान ... ८३
६७) चित्र पहाटे उदयाचलीचे... ८४
६८) एवढे दमकू नका ... ८५
६९) सृष्टीभर लीला ... ८६
७०) दिव्य रूप सावळ्याचे ... ८७
७१) लुकलूक गंधगोण्या ... ८८
७२) इच्छा दुर्दम्य ... ८९
७३) आभाळानं प्रेम दिलं ... ९०
७४) रानसृष्टी बोलणे ... ९२
७५) होऊन चित्तचोर ... ९३
७६) फुलं रंगभरात ... ९४
७७) देवांचे दिव्यत्व सापडे ... ९५
७८) पंखामधले बळ अनमोल ... ९६
७९) सृष्टीराधा ... ९७
८०) धरित्रीच्या की कुशीत ... ९८
८१) अंतरीच्या दर्पणात ... ९९
८२) ते भावनांची भाषा ... १००
८३) त्याची उषा गेली कुटं ... १०१
८४) आभाळाची छाया ... १०२
८५) नीलांगणी प्रभाती ... १०४
८६) तपोवनाचे पावित्र्य ... १०५
८७) डोळे येतात भरू ... १०६
८८) हिरव्या गवत पात्या ... १०८
८९) हुल्लड गाणी ... १०९
९०) सागाची दाटी ... ११०
९१) काय सांगावे नभाला रंग आले ... ११२
९२) असे सौंदर्या टिपावे ... ११३
९३) सोनभविष्य प्रकाशी ... ११४
९४) आकाशीच्या निळाईने ... ११५
९५) आता तुला पटले ना ... ११६
९६) स्वर्ग वेगळा कुणी पाहिला ... ११७
९७) जुळले धागे जुळल्या तारा ... ११८
९८) दान मिळेल नभाचे ... ११९
९९) बंध त्याचे जोडलेले ... १२०
१००) अन पंखातून उमेद भरता ... १२१




## (१)
## उधळण रंगांची

ही उधळण त्या रंगांची
की रूप त्या ईश्वराचे
रोज दर्शन तो देतो ना
हे खेळ परमेश्वराचे

तो हसतो तेव्हा
शुभ्र रंग विलसतो
तो रमतो तेव्हा
आकाशी रंगी पसरतो

तो कृपा जेव्हा करतो ना
केशरी रंग भरभरतो
तो भरून जाय भक्तीने
ढग भरल्या रंगी उरतो

कधी नितळ होत रंगाने
तो हृदय आपुले सांगे
कधी निरभ्र आकाशातून
तो भाव तयाचे मांडे

कधी घुम्म होतं आभाळ
सारे रंग काळपट होती
तो निराश असतो नक्की
तेंव्हा रंग रंगहीन होती

सूर्य उगवतो जातो
दोन्ही वेळा रंग बहरती
तो येतो त्याच्या रूपे
रंगची सोबत करती

त्याला प्रिय सारेच रंग
तो त्यातुन प्रकटत जातो
त्याची रोजंच होते होळी
त्याची रोजंच असते दिवाळी

तो कळेल जेव्हा तेव्हा
सारे रंग रेखुन जातील
ती मूर्त त्याची अनुपम
हृदयात रंगवून जातील

दि.११/०६/२०२०
रात्री ८.३८ वा.



## (२)
## नितळ आभाळी

अशा नितळ आभाळी
रूप धरेचे पहावे
त्याच्या आकाशी रंगाला
मनातून साठवावे

असे विशाल विशाल
हृदयास करताना
पारदर्शी नि निरभ्र
तत्त्व आत भरताना

धरा खुलली खुलली
उत्साहित हरिभरी
तिच्या मनात नभाची
उत्तुंगता व्यापणारी

नभ आहेच असे की
साऱ्या सृष्टीचे ते छत्र
कुणी म्हणती पोकळी
आधाराचे हेच गोत्र

भुईवरच्या प्रेमाने
व्योम वाकते टेकते
क्षितीजाच्या रेषेवर
धरा आकाशी भेटते

त्याचे शुभ्र निळेपण
तिच्यावर बरसते
तिच्या गर्भात नभाचे
बीज तरारून येते

वनराई वाढते नि
वाढते हे सस्य सारे
आकाशाला नमन्याला
झाडे उंच वाढती रे

दोघे प्रेमाने करती
पर्यावरण संसार
असा स्वच्छ तो राखावा
संतानाने हेच सार

मानव ही संततीच
सृष्टी मातापिता त्यांची
चला जपू या निर्मळ
तत्त्वे महाभूतांची ही

पृथ्वी आई आपुली ही
आकाश हे पिता जाण
जल अग्नी वारा सारे
पितृतुल्य असे मान

यांच्या नियमाचे करू
सारे मिळून पालन
हस्तक्षेप नको उगा
राखू पर्यावरण

मग सुंदरता अशी
यांच्या रुपात पटेल
हसणारा हा निसर्ग
माणसाला की भेटेल

दि.०५/०६/२०२०
दुपारी १.२७ वा.
जागतिक पर्यावरण दिन



## (३)
## धरती आली वयात बाई

धरती आली वयात बाई
गाली गुलाबी लाज सजली
अंगा अंगात पाकळी भरून
गुलाबी सारी तनूच झाली

झाडावरून प्रेम प्रकट
करत गेली उमलत गेली
वसंत आला ती भरात आली
फुलांच्या प्रेमे नाहून गेली

त्याच्या स्वागता पायघड्या ह्या
भावफुलांचा सडा टाकला
वसंत येता तिच्या तनूने
शृंगार साज साराच केला

तिची कांती गुलाबी होऊन गेली
झाडी फुलली रंग मदनी
फुलात धरती डवरून आली
वेगळीच तेजकांती वदनी

आज ती झाली जणू नवरी
नवरा ऋतुराज पाहुनी
असाच राहो जन्मभरी हा
साथ दोघांची गेली मागुनी

दि.१३/०६/२०२०
दुपारी ०२.०२ वा.



## (४)
## ताज्या गवताचा शेला

ताज्या गवताचा शेला
अंगावर पांघरला
माती झाकली झाकली
तिनं ऋतू नवा ल्याला

त्यात अनोखा गारवा
अंगी उमटे शिरवा
शहारल्या रोमरोमी
पाचू गंधाने मारवा

तिचा चाले हा सोहळा
ताज्या गवताचा मळा
त्याची मखमल खाली
वसुंधरेला गुंडाळा

सोनउन्हाची तिरीप
कशी लाडात येऊन
खेळे हिरवळीसंग
लोळे झोकात येऊन

देह पहुडतो थोडा
दिनकर प्रभातीला
घेत विसावा मऊसा
पुन्हा जुंपतो कामाला

राती खेळतो चांदवा
त्याच्या चांदण्याची मौज
तृण चांदीत भिजते
त्याची शीतलते हौस

मग साखरझोपेत
शुक्र चांदणी भेटते
गवतास सारे सुख
आता मिळाले वाटते

दि.१४/०६/२०२०
सकाळी ७.५७ वा.



## (५)
## पानापानात हिरवा पिवळा

पानापानात हिरवा पिवळा
रंग रेषांनी सजून गेला
रूप आपुले गोजिरे पाहून
त्यांचा आनंद गगनी गेला

रूप निरखावे कोठे हे
पान पानंच दर्पण झाले
किती सुंदरता आपुलीही
मन स्वतःस अर्पण झाले

जणू ललना ह्या सुंदर
उभ्या ऐटीत राहिलेल्या
आरशात पुन्हा पुन्हा
आपले लावण्य पाहिलेल्या

कुणी म्हणाली नितळ नभ
बघतंय पर्णकांतीला
गगनाच्या मनी येते
पानबुट्टीचा शेला धरतीला

की ह्या अदा तिच्या
भुलवती मला
राणी वसुंधराऽऽ
नभराजा हा पाघळला

मेघ होऊन ओघळला
मोती गळ्यातल्या माळा
दवबिंदूंच्या घे तुजला
प्रीतपानात हो गोळा

हास अशी तू गालात
खळ्या चुंबून घेईन
थेंब पावसाचे होत
पानोपानी मी राहीन

दि.१६/०६/२०२०
सायं. ०७.३० वा.



## (६)
## अंथरला गं गालिचा

अंथरला गं कुणी गालिचा
मखमल पुष्पी रंगरंगीला
अवनी सारी सजून गेली
मनात साजन येऊन गेला

निळ्या जांभळ्या हिरव्या पिवळ्या
लालचुटुक धवल नि केशरी
गडद फिक्या साऱ्या साऱ्यांनी
रेखीव रांगोळीच रेखीली

आज धरेवर उत्सव आला
रंग निळा गगने पाठवला
म्हणे चंद्रमा ढवळा माझा
सूर्य देतसे केसर रक्तिमा

किरणे पिवळी फुलेच झाली
झाडांनी हिरवाई दिधली
रंग मिसळुनी गेले सारे
शाल जांभळी गुलाबी झाली

कितीतरी या मिश्र छटाही
पसरून गेल्या पाकळ्यांवरी
निसर्ग विणतो उंची शेला
दिला धरेच्या अंगावरी

खुलली खुलली अशी की भुलली
तेजाने तिचे रूप निखरले
रसिक गगन मग साजन होऊन
छत्र निळेशार तिजवर धरले

जो पाही तो दंगून गेला
सजली धरती गगनी गुलाला
आतून आले रंग पसरले
मदनाचा हा प्रेमी भाला

दि.०४/०७/२०२०
सकाळी ०९.२३ वा.




## (७)
## काळा सावळा हा श्याम

काळा सावळा हा श्याम
नभातुन दाटलेला
वाजवीत जलधारा
हाती तोच पावा घ्यावा

मन होत गोपगोपी
त्याचा स्नेह की झेलावा
राधा अंतरात्मा होई
श्याम राधेत विरावा

झरताना आभाळाने
मज चिंब ओलवावे
असा पाऊस येताना
गीत ओठात झुलावे

दि.१७/०७/२०२०
दुपारी ०१.३५ वा.




## (८)
## गेली नभात नारळी

गेली नभात नारळी
स्वच्छ नितळ आकाश
भरते ना ढगांसवे
आत जलाने आभाळ

तरु इतरही सारे
जणू भरात की येती
गगनाच्या दर्पणात
निजबिंब ते पाहती

काही गुज लपविले
त्यांनी मनात कधीचे
सांगण्यास उतावीळ
प्रेम भुईचे भुईचे

घर कौलारू पाहते
साऱ्या ऋतूंची मिजास
आत जपून ठेवते
एक उबदार आस

अशी प्रसन्न सकाळ
घरीदारी पसरावी
क्षणी हुंगावा सुवास
चिंता सारी विसरावी

दि. २०/०८/२०२०
सकाळी ०८.३४ वा.



## (९)
## रंग पसरले

अहा! आज काय रंग पसरले
पाहून मी भान सारे विसरले
आकाशाने आज खेळली की होळी
रंगपंचमीची उधळण झाली

आज आकाशी निळ्या या रंगात रंगला
फिका केशरी गुलाबी रंग ढवळा विरला
सरोवर सुंदर ते देखणाची आरसा की
नभातून अप्सरांची इथे प्रतिबिंबा दाटी

नभ आधीच सुरेख त्यात वर्ण रमणीय
झाडे झुकली जराशी जणू कांता कमनीय
शांत निवांत जळात रूप निरंखत जावे
सुख अनन्य इथेच सारे साठवून घ्यावे

सारे सारेच सुरेख, कोण किती ते सरस
कसे सांगावे लावण्य, वितळलेले पारस
आरपार शिरले हे चित्र हृदयात माझ्या
अशी प्रेमात पडले बाबा चित्रकारा तुझ्या

असे रंग की भरावे कर्म कुंचल्याने सारे
जणू मोरपीस मनी अलगद फिरणारे
मीही अलवार राधा सारी बंधने तोडून
जीवलगी कृष्णसखा एक आत्म्याशी
जोडून

दि. १३/१०/२०२०
सायंकाळी ७.२३ वा.



## (१०)
## उगवतीच्या शुभरंगांनो

उगवतीच्या शुभरंगांनो
उगवून या ना मज आकाशी
आणिक आणा सूर्य मागुनी
तेजाळलेला चित्तनभाशी

एक सुवर्णासम कांतीने
अंतःकरणी घ्यावा ठाव
चित्तसूर्य उदयाचली यावा
आत्मसविता त्याचे नाव

हळूहळू तो प्राचीवरती
रक्तरक्तिमा घेऊन येवो
मागे मागे उजळून दिग्बल
क्षितिजासम मन नवेच होवो

सप्तरंग मग आयुष्याचे
या सूर्याने उधळून द्यावे
मज हृदयाच्या नभांगणावर
इंद्रधनू ते उमटून यावे

रोज पहाटे पहाट गावी
सप्तसुरांचे सूर नव्याने
मंजुळ वेणू उमटून जावी
गोकुळगावी पुन्हा नव्याने

दि. २१/११/२०२०
०७.३९ वा.



उंच इमारत माझी
कौतुक प्रगतीचे
फिके पडते परंतु
निसर्गाच्या किमये पुढे ते

तेज फाकते फाकते
इमारत खुजी भासे
स्पर्श करण्या आकाशा
जणू चढली उंच असे

सामावून घेऊ त्याच्या
दिप्तीमंत तेजश्रीला
उठू पहाटे पहाटे
मिळवू आरोग्याच्या श्रीला

त्याच्या अगम्य चालती
लीला अनंत आकाशी
चित्त भरून टाकावे
ऐशी कांत तेजोराशी

दि. २३/११/२०२०
सकाळी ०७.३५ वा.

## (११)
## ढगाढगांचा गालिचा

ढगाढगांचा गालिचा,
नभांगणात अंथरला
बघा सकाळी सकाळी
सूर्यनारायण अवतरला




शुभ्र तक्रासम मऊ
रंग वर फेसाळतो
गोळा नवनीताचा हा
जणू सोनेरी फळतो

सूर्यनारायण आला
आला तेजाळ मधाळ
रस रूप गंध त्याचा
पांघरते ही सकाळ

त्याचे बिंब वर वर
जसजसे सरकते
नवनवीन विचार
जगण्यास सांगताते

रोज रोजचे मंथन
दोर मायेच्या की हाती
रंग रोजचे नवीन
चित्रकार हा प्रवीण

दि. २४/११/२०२०
सकाळी ०८.२१ वा.

## (१२)
## वारा घोंगावतो आहे

वारा घोंगावतो आहे
नभ घुसळून जाय
सागराची ही निळाई
गगनात पात्र होय



## (१३)
## वर आकाश दुस्तर

खाली सुंदर प्रस्तर
वर आकाश दुस्तर
मेघ हलकेफुलके
कापसाचे ते बिस्तर

आकाशी हा निळा रंग
डोकावतो ढगातून
खडकांच्या हृदयात
स्रोत पाझरे आतून

वरवर ते भकास
वाटताती ते उदास
आत जपलेला त्यांनी
किती युगे इतिहास

शांत अबोल हे सारे
मार्ग एकला निवांत
कधी एकट्याने जावे
मन करावे प्रशांत

गुज धरतीचे ठावे
अनंतशा आकाशाला
आकाशाची घुसमट
घालमेल जाणे धरा

दोघे एकमेकांसाठी
होत आरसा देखणे
बिंब न्याहाळता दोघे
एकरूप एक होणे

वरवरती सुखावे कोणी
चित्र ते पाहून
आत खाचखळगे की
अंतरंग निरखून

असे डोकवावे आत
मन आकाश उकले
धरा आत्मरूप होय
जगणेच रम्य झाले

दि. ०४/१२/२०२०
सकाळी ०८.५४ वा.



## (१४)
## निळ्या जांभळ्या क्षितिजाशी

निळ्या जांभळ्या क्षितिजाशी
सांज गुलाबी टेकली
नभ राणी सागराला
पाहण्यास की वाकली

तिचा शालू भरजरी
जर चांदण्यांची खडी
पदरास जांभळाई
बिंब सागर हृदयी

त्याचे मनंही गुलाबी
लाटा उसळून येती
प्रेम तरंग नव्याने
त्याची उतावीळ भरती

आज लाडात आलेली
किती रंग ती ल्यालेली
एक रंग उसळतो
सुधा न्यारी की प्यालेली

अशा सांजमीलनाला
चंद्र साक्ष देत राही
लाज गुलाबी वाढवी
तो की प्रेमदूत होई

मावळतीच्या सूर्याने
मंद प्रकाश केला हा
अशा लाघवी प्रीतीच्या
किती वेल्हाळ वेळा ह्या

सय दिसभर तिची
नभांगना कामामध्ये
जरा फुरसत आली
रत्नाकर जोमामध्ये

तिचे नितळ ते बिंब
याच्या अंगाखांद्यावर
दोघे भेटले मिठीत
कसनुस बांधावर

क्षितीजाच्या मनी फुले
मीलनाची गोड बात
डोळे मिटून घेताच
नभसागर भरात

दि.०८/१२/२०२०
सायं. ०७.११वा.



## (१५)
## गुलबक्षी रंग हा हसतो

गुलबक्षी फुलांची नक्षी
अधरांवर उतरे रंग
कोमलता लेऊन तन्वी
शिरशिरून अंगोपांग

एक रंग गाली कपाली
एक नयनांतून झळकावा
एक नजरेतून झुकताना
लाजमी मनी उमटावा

हा रंग खुणावी मजला
की प्रणयसुखाची नांदी
नाते बहरून हे जाता
दोघांना रेशीम बांधी

ही फुले गडद रंगांची
कोवळ्या मृदुल अंगांची
सय आणून देती सखीची
प्रीतीच्या त्या धुंदीची

हा स्पर्श फुलांचा होता
करस्पर्ष जाणवे तोच
थरथरत्या हातांमध्ये
प्रेमाची असते पोच

ती नेत्र उघडते ऐसे
हळुवार दार उघडावे
प्रेमाच्या प्रासादाचे
मी मजले चढून जावे

ती आत सजलेली राणी
गुलबक्षी शालू रेशमी
त्यावरती मज प्रेमाची
नक्षीही कोरून झाली

तो रंग मीच झालो ना
ती रंगांवरती स्वार
जगण्याच्या रंगीत चाली
ती नाजुक चाले नार

ही फुले गुलाबी गर्द
झिंगुनी डोलती पवनी
मी भरलेले आभाळ
ती आसुसलेली धरणी

हा रंग नभाला भिडतो
कुशीमध्ये धरेच्या रुजतो
तिज डोळ्यांमध्ये दिसतो
आम्हा दोघांमध्ये असतो

गुलबक्षी रंग हा हसतो
गुलबक्षी रंग हा हसतो

दि. ०४/०१/२०२१
दुपारी १२.११ वा.



## (१६)
## निळ्या हिरव्या पिवळ्या

निळ्या हिरव्या पिवळ्या
साऱ्या छटा मिसळल्या
रंग तबकडी नभ
चित्रकारे घुसळल्या

एक फटकारा ओढी
कुंचल्यातून आपुल्या
चित्र रोज मुक्त होई
देत प्रकाश सावल्या

नभ पिवळे धम्मक
डोंगराला नील कांती
हिरवी गडद झाडेही
तृण पोपटी पोपटी

पुष्कराज नभांगणी
राशी नीलम डोंगरी
पाचू हिरवे हिरवे
वृक्षांवरी भुईवरी

कधी वाटते वाटते
आकाशाला दुलईत
पितांबरी पांघरून
पहा झोपलेले इथं

पहाडांनी निळीशार
जाड कंबळ ओढली
अंग जाडं भरडं हे
आत भरली हुडहुडी

झालं वेली ताजी झाली
रंग तवाना अंगाला
हिरव्या रंगाच्या कुपीचा
नाही तुटवडा त्याला

थोडा फिका केला तोच
गवताला फासलेला
रंग देत थंड थंड
पायी राजाही चालावा

दिनमणी उगवता
मावळतीलाही रंग
केशराचे पिंप भरे
सारा रंगांचाच संग

रंग कळतील कारे
रंग प्यारे आणि न्यारे
काही नजरेत येती
काही आतून पसारे

मोरपिसारे पिसारे
रंग फुलातून द्या रे
रंगारंग जीवनाला
रंग भरून करा रे

दि. ०५/०३/२१
रात्री १०.१० वा.



## (१७)
## ऋतू भुईवर

असा सांडला ऋतू भुईवर
लाली गाली धरा सैरभर
शालू प्रेमाचा पांघरला
फुले माळली अशी अंगभर

नाजूक साजूक मृदु पाकळ्या
लाजवीत त्या तिजसी सगळ्या
स्पर्श प्रियाचे होऊन गेल्या
मनात फुलल्या लाघववेळा

प्रीत गुलाबी उधाणलेली
अंगडाईतून विसावलेली
झाडझाडातून उमटली
वसुंधरा ही रती जाहली

मदनमंजिरी वेळीअवेळी
ऋतुविनाही बहरा आली
प्रेमपरिमळे सुमने फुलता
मने युगुलांची भरास आली

दाट गडद हा रंग गुलाबी
सर्वांगावर उमलत जाई
आणि धरणीच्या कुशीत प्रियवर
वसंत वेडा फुलून जाई

दि.२६/१२/२०२०
सकाळी ०९.५१ वा.



## (१८)
## धुकाळलेली ही सकाळ

धुक्याच्या पडद्यामागे
लपवला रविराजाला
सारे सारे न्याहाळता
चलबिचल उषामनाला

रोज रोज पाहती त्याला
लोक किती नजर ती लागे
सुंदराचे रूप दिनकर
तेज त्याच्या मागे मागे

आज जरा वाढली थंडी
धुके गेले दाट पसरून
उषा म्हणे थांबा जवळी
कामं सारे तुम्ही विसरून

साखर झोपेची आज
लाभावी पहाट धुंद
नित्यक्रम आहे रोजची
आज वेगळाची गंध

नभ कसे धुके धुके
झाडं पांढुरकी फिकी
खग उडताना भ्रम
गेले कुठे आकाश की

धरतीला पहा आज या
तलम पडद्याच्या आतून
अंग ती चोरताहे
धुक्याच्या पांघरणातून

आपणंही थांबू थोडे
रेंगाळून जाय सकाळ
कुशीतसे घेऊन मजला
चाला आकाश ढगाळ

दि.०५/०१/२०२१
सकाळी ०९.५१ वा.



## (१९)
## आभाळमाया

माय मायेची साखर
तिचा जीव ही लेकरं
तिची माया आभाळाची
ओढ तिच्या आसऱ्याची

माय व्हतीया माऊली
जवा पोटात बाळुली
तिच्या श्वासात वात्सल्य
तिच्या डोळ्यात सावली

घासागणिक पोसती
माया रगती असती
लेकराच्या सुखासाठी
तिच्या जगण्याच्या ज्योती

ऱ्हावो कुठं बी लेकरू
मन भवताली फिरू
जसं लाडकं वासरू
तिच्या जिवाचं कोकरू

पाडसाची ती हरिणी
तिची माया पांघरुणी
घ्यावं आभाळ कुशीत
माय मायेची धरणी

दि. १२/०७/२१
सकाळी ०९.३८ वा.



## (२०)
## एक आपलं आकाश

कित्ती देखणी देखणी
इमारत महाराणी
वास्तू सुबक रेखीव
ठसठशीत आखणी

रंगसंगती नभाची
नभ भरून आलेलं
रूप न्याहाळत इथं
उतरून की आलेलं

इमारतीचा आरसा
वर आभाळाचा स्वच्छ
नभललना भाळून
रूप सावरते दक्ष

तिचे दर्पण ती वास्तू
एकमेकींचे सहारे
थोडे जलथेंब येता
येती फुलून शहारे

अशी गप्प गप्प शांत
वास्तू माणसाविनाच
जशी अबोल वधूची
घालमेल मनातच

थोडा उल्हास नि आस
थोडी कळा ती उदास
जग सारे डळमळ
एक आपलं आकाश
एक आपलं आकाश

दि.०६/०४/२१
सायं. ०७.०४ वा.



## (२१)
## आज नभी लाजली ही उषा

आलास प्रिया तू असा जीवनी
सुखस्वप्नांचे पंख घेऊनी
पाऊल नसते अवनीवर मज
उंच भराऱ्या माझ्या गगनी

आनंदाने विहरे आणिक
वाऱ्यावरती लहरे मी
एक अनामिक दैव संगती
आपुल्या हाती पाहते रे मी

एक सुखाची ग्लानी मजला
बुडून जाते तुझ्यात मी
मी झोपले की जागी असते
गढून गेले तुझ्यात मी

काय होते मज असे नेमके
शब्दच नाहीत प्रिया सांगण्या
आकाशातून उडताना मज
ये ना सख्या तूही सोबत उडण्या

हा आनंद ही नवीन आशा
आपुल्या प्रीतीची नव परिभाषा
तू मी, मी तू एकरूप अन
आज नभी लाजली ही उषा

दि. ०९/०४/२१
सकाळी ०८.१७ वा.



(२२)

## घरटे छोटे असे एकटे

चल घेऊन ऐशा नितळ निसर्गी
घरकुल सान बांधून
किती रंग बघ इथेच रमले
सृष्टीस रेंगाळून

डोंगर हिरवे निळे पांढरे
खुशाल नटूनी जाती
हिरव्या हिरव्या झाडांच्या ह्या
छटा निराळ्या होती

सरोवरातील जळी उतरली
जलराणी निळी हिरवी
चित्र रेखते दिसते सुंदर
स्वतःस निरखे बरवी

आकाशाचा रंगच खुलला
निळाशार उजळुनी
मधे पांढऱ्या शुभ्र रेशमी
नक्षी मेघाळुनी

हिरवा पोपटी गालिचा हा
तृणांकुरे मलमली
प्रीत फुलावी रम्य स्थळी या
एकांती शाल्मली

घरटे छोटे असे एकटे
साथीला स्वर सात
काय हवे रे अजून राजा
हाती तुझ्या मज हात

एकरूप या सृष्टीसंगे
होऊन जावे गुंग
किती काळ सरसरकून गेला
आपण इथेच दंग

असे असावे स्वप्नं सुरीले
इंद्रधनूचे रंग
वास्तव ऐसे कधी लाभता
अजरामर तो संग

दि. १६/०४/२१
दुपारी १२.४७ वा.



## (२३)
## दुःख बोलके वसुंधरेचे

वसुंधरा दिन आहे म्हणुनी
बोलते काही आज
दुःख मनातील सांगू कुणाला
आहे मी नाराज

घ्या मुलांनो काळजी माझी
तिळतीळ तुटते आहे
वर्तन हिंसक मर्म छेदिता
काळीज फाटते आहे

तुम्हा पोसते अन्नजलाने
प्राणवायुही देते मी
वस्त्र निवारा शीतल छाया
ऋतू सुंदरसे आणते मी

वृक्षवल्ली मजवरची सृष्टी
केली अरण्ये नष्ट
कुरघोडी रे करता तुम्ही
खोदून करता भ्रष्ट

खणले सारे, भोके हजारो
जखमा भळभळणाऱ्या
उष्मा वाढवून हिमनग गळती
लाटा फेसाळणाऱ्या

अण्वस्त्रांनी विवस्त्र केले
बॉम्बगोळे मज भेदून गेले
विज्ञानाच्या प्रगतीमध्ये
बुद्धिभ्रष्ट तुम्ही वाहून गेले

अध्यात्माने माय मानले
कब्जा सांगे विज्ञान
ज्ञान कोणते नसते वाईट
हाव विखारी जाण

तुम्ही बागडा मुक्तपणे पण
मला हानी ना करा कधीही
आई बोलते हाक ऐका ना
मी जगले तर जगाल तुम्ही

नाते सुंदर युगायुगांचे
आईला असे छळू नका
पुन्हा कुशीतून फुलून येण्या
माया माझी कळून घ्या

दि. २३/०४/२१
सायं. ०६.४६ वा.
जागतिक वसुंधरा दिनानिमित्त



## (२४)
## नभ मोकळे झालेले

आत भरून साचले
किती दिसांचे वाफारे
आधी हलके वाटती
पुन्हा जड ते झालेले

एक अवस्था आधीची
मग जलथेंब होती
ओझे मनात वाढते
चाल मंदाऊन जाती

तो तो ढग बने एक
आत गढूळ प्रकाश
वाढतंच चाललेली
गर्दी मेघांची तशात

कोणी अडवण्या येई
दुःख डोंगर विशाल
वारा उडवण्या पाही
आत हजारो शकलं

ऋतू यावा लागतो ना
ढग गाभुळण्या आले
कुणी भेटता आपुला
नभ मोकळे झालेले

दि.२२/०४/२१
दुपारी १२.२३ वा.



## (२५)
## चंद्राआडचं आभाळ

चंद्राआडचं आभाळ व्हायला
मन मोठं लागतं रे
चंद्र झेलून मागे राहणं
सांग कुणाला जमतं रे

स्तुती झाली तर होईल शशीची
आभाळ रिक्त असेच ना
तेजाला त्याच्या सांभाळूनही
आभाळ अंधार लेतेच ना

चंद्र आला की गोळा चांदण्या
एरवी कोणी फिरके ना
काळ ढकलावा म्हटलं तरीही
कृष्णपक्ष हा सरके ना

ती भयानक रात्र काळोखी
अमावस्याही परकी ना
आभाळाला दोन्ही सारख्या
पूनम अथवा अमावस्या

ते एकाकी जगणे अवघड
एकटेच ढग पोसणे ना
चंद्र तारे पाऊस इंद्रधनू
सगळे इतरांस्तव असणे ना

हसले तर ते पडे चांदणे
काळोखाने कृष्ण निळा
गप्प बसे तर घुम्म आभाळ नि
गर्जत असता घन बावळा

स्वच्छ दिसे तर पिंजला कापूस
गरजे तर मग बरसेल काय
पाऊस पाडून पाहतो तेव्हा
श्रेय मृगाला वर्षी जाय

चंद्राआडचं आभाळ होणं
आधार केवळ बनून ऱ्हाय
कधी ना नशिबी कौतुक येईल
खापर फुटलं जाईल पहाय

चंद्राआडचं आभाळ हसरं
दुःख कुणाला समजे ना
असून नसून कुणी ना आपुले
जखम कुणाला उमजे ना

चंद्राआडचं आभाळ होणं
धुमसून गुपचूप रडणं फार
सुखास थारा नाही कधीही
दुःख बोचरे, अति धारधार

दि. २९/०४/२१
सायं. ०५.२१ वा.



## (२६)
## अशी कांती तेजाळली

गेला बुडून डुबून
सायंकाळच्या प्रहरी
क्षितिजाशी रेंगाळली
केशराची छटा न्यारी

जाता जातानाही देतो
रविराज दृष्टिसुख
वर निशापती आला
भागे चांदण्याची भूक

एक तेज तळपते
एक आल्हाद लेऊन
दिन प्रकाशित करी
एक रात जागवून

एक येतो उठवत
एक झोपण्यास सांगे
दोघे चालवती रथ
सृष्टी रंगातून दंगे

एक मावळतो तरी
मनी उगवत राही
एक उगवतो जरी
शीण जाय मावळती

नभी सौभाग्याचा टिळा
केशराचा गंधमळा
निशी सजून धजून
चांद रुपेरी बावळा

जीव त्याच्यातंही आहे
जीव याच्याही भवती
जिथं तेज शीतलता
थोडं थांबू की सांगाती

राहे आदित्य हृदयी
चंद्र मनातून वाहे
एक दिवसाचे स्वप्नं
एक रातीस रमवे

अशी कांती तेजाळली
दिशा कशी उजळली
औक्षवण करते ही
तेज किरण अवळी

दि. २५/०४/२१
रात्री ०८.०३ वा.



## (२७)
## अशी सफर बघ आयुष्याची

उंच उंच नभी तुझ्यासवे मी
उडले मनमोकळी
फूल जाहले आणि जीवाचे
खुलली पाकळी पाकळी

ते बंदिस्त जीवन माझे
गर्त दुःखाची होती
एक सकाळ अशी उगवली
उडून गेली भीती

तू आलास नि पंख दिले मज
उंच भरारी घेण्या
सोबत होता तूच राजसा
हात हाती सांभाळण्या

अथांग नभ ते अथांग सागर
पर्वतराजी सुंदर
धुके बोलके क्षण पळणारे
वनराजी अपरंपर

उत्साहाचे पडती धबधबे
नदी वाहते रे सुसाट
वारा गाली गुज सांगतो
प्रीत विहंग अचाट

मी कुशीत आकाशाच्या
धरती आली आली कवेत
ऊनसावल्या निळी निळाई
हिरवाई आवेश

अनंत इच्छा पक्षी थवे हे
उडती स्वच्छंदाने
हात हाती तुज देता झुलले
जीवन आनंदाने

अशी सफर बघ आयुष्याची
घडवून गेला राजा
दूर क्षणी ते मळभ कधीचे
सुगंध ताजा ताजा

दि. ०७/०५/२१
सकाळी १०.२३ वा.



## (२८)
## सुन्न मनाची विषण्ण दारे

अथांग सागर प्रवास इथला
दोन गलबते अशी साथीला
रात पुनवही चांदण वेळा
तेजोहीन परी का हा चांदवा

उगा उदासी पसरून गेली
चेहऱ्यावरती मंद चांदणी
काय जाहले आज ह्या राती
लुप्त चांदण्या बघ आकाशी

पाण्यावरती प्रतिबिंबाच्या
मंद तेजाने लाटा शिणल्या
आणि तरंगी हुरहूर हुरली
सागर वेडा असाच दमला

प्रवास होतो होतंच राही
अंतर काही कटतंच नाही
आतबाहेरी सुन्न विचारी
असे प्रवासी संकट दारी

कुणी ना सोबत तरी गलबते
साथ देऊनी पुढे चालली
अजून काही दिस येई अमावस
दिसामाजी ही उदासी वाढली

कंटाळवाणे वातावरण हे
सुन्न मनाची विषण्ण दारे
आज न वाहून वाहत येती
कुठून अनोळखी विचित्र वारे

असा नकोसा प्रवास जीवन
कधीतरी हे उदास की वन
एकटे आपण समूह असूनही
एकटे जाणे एकटेच मन

दि. ११/०५/२१
सकाळी १०.२९ वा.



## (२९)
## गंध जगण्याचा यावा

वर दाटलं आभाळ
खाली सरोवर चिंब
ढग पाहतात खाली
जळी निज प्रतिबिंब

ऐसपैस पसरला
जरा निवांत डोंगर
त्याची हिरवी दुशाली
रूप दिसते सुंदर

काठी घरकुल उभे
सृष्टीराणीच्या कुशीत
दार पापण्या मिटून
आत स्वप्नं खुशीत

त्याच्या भवताली सारा
तृण गालिचा पसरे
चालताना मऊशार
स्पर्श काट्यांचा विसरे

अशी देखणी नाजूक
पायवाट नागमोडी
जणू हातावर रेखा
आयुष्याची कुणी काढी

दूर पांघरे नीलम
रंग अंगावर नग
त्याची ओढ मोहनाची
फिरणारे मोरपीस

अशी डोलती चैतन्ये
गंध जगण्याचा यावा
सूर आसमंती नाद
ऐकू येई बघ पावा

दि. १६/०५/२१
सकाळी ०८.२७ वा.



## (३०)
## जाई न जाई कधीही

जाई फुलांनी बहरून
गेली सुरेख बाई
त्या सात पाकळ्या अन
ती शुभ्र हास्ये काही

सुरभीचे चौघडे हे
आले निनादुनि हो
पसरून गंध गेला
आणिले खेचुनी हो

घरी दारी अंगणी या
अत्तर पसरले ना
तू भेटण्याचे मजला
सत्तर बहाणे पहा ना

घेऊन ओंजळीत
गजरा मी गुंफीयेला
तुज हाती माळताना
मजजवळी आणे तुजला

दिवसाच चांदण्यांनी
आभाळ माझे भरले
क्षण काही गंधवेडे
स्मृतिकोशी माझ्या उरले

ऋतू संपतो तरीही
जाई न जाई कधीही
माझे नि तिचे नाते
रेंगाळते अजूनही

दि. २४/०५/२१
सायं. ०६.२१ वा.



## (३१)
## सर वळवाची होय

सर वळवाची होय
तुझ्या आठवांची धार
विरहाच्या झळा देती
तप्त उदासी प्रखर

येते आभाळ भरून
त्याला मृग नाही नाही
असे बरसून जाते
त्याला झरण्याची घाई

असा ग्रीष्मात कोरडा
उष्ण वारा बोचताना
एक एक सर होई
सुख उतारा तेव्हा ना

झाडं जगण्याची गेली
कधी ऋतू सुकवतो
एक ऋतू वेगळाच
असा मध्ये डोकवतो

ये रे ये रे जीवलगा
ऋतू उन्हाळा सोसेना
कुणी देईल गारवा
असा वळीव दिसेना

जगण्यात वळीवाचा
एक सडाका तू टाक
विसरेन ताप सारे
तुझ्या वर्षावाची हाक

भले येऊ दे कधीही
आता कितीही उन्हाळे
एक एक सर माझ्या
हृदयात दव ओले

दि. १५/०५/२१
रात्री १०.४७ वा.




## (३२)
## सर्ग निसर्ग हासरा

सर्ग निसर्ग हासरा
सुंदर दुलई आवरण
कोमल करांनी जपू या
चला आपुले पर्यावरण

सूर्य उगवतो पूर्वेला
आभा पसरते जगण्यात
रजनी चांदण्या लेऊन
न्हाती धुती चांदण्यात

उडती आकाशी पाखरं
गाणी आनंदी गाऊन
वहाती नद्या धबधबे ही
झरे येती खळाळून

डवरून फुलांच्या गोंदण्या
डुलती झाडं न वेली ही
हिरवी तृणांकुरे बाळे
बिलगून आईला खेळती

सारे ऋतूंचे सोहळे
भाव तरल नि कोवळे
गंध मातीचा दिगंती
पंचप्राण सुखावले

सृष्टी माय अशी आपुली
देता कधी न थकली
आपण हानी पोचवता
ती त्या दुःखानं वाकली

नको खोदणं डोंगर
खोल जमीन पोखरणं
दूषित हवा पाणी वायू
विष हे निसर्गी घोळणं

पर्यावरण प्रेम माया
त्याला मायेनं जपावं
धरणी माईला आपुल्या
झोकं सुखाचं झुलवावं

दि. ०५/०६/२१
सकाळी ०८.५३ वा.



## (३३)
## मन पाऊस पांघरी

कळी भिजली भिजली
मनी उमलून आली
अंगावर दवबिंदू
माळ मोतीयाची झाली

ऋतू भिजण्याचा आला
गंध मातीचा सुटला
निजलेल्या बिजागरा
कवळा अंकुर फुटला

गर्भार वसुमती
सस्य तिची हो संतती
तरारून उगवती
साऱ्या धान्याच्या प्रजाती

मळे फुलांचे फुलती
फळबागा हो डोलती
घरादाराच्या छताशी
थेंब सूरही धरती

पानोपानी गुज ओले
ओली पाकळी पाकळी
धुंद वाहतो शरीरी
वारा अत्तरांच्या कुपी

असे लावण्य हे चिंब
खट्याळाच्या प्रीतसरी
तनू भिजली मनीही
मन पाऊस पांघरी

दि. ३०/४/२१
सकाळी ०७.५४ वा.



## (३४)
## निळी मदमस्ती

निळ्या पांघरून नभाला सखी
धरती झाली निळी श्याम सखया परी
निळ्या डोंगरांची गडदशी निळाई
मनी रत्ने नीलम पेरून जाई

अशी ही सकाळ कशी धुंद झाली
मस्तीतली रात अशी मंद झाली
जळातील प्रतिबिंब झाले निळे
मला रंग माझाच नाही कळे

जरी वनराजी हरित हिरवाई
निळी पारदर्शक पांघरून निळाई
जणू वाटते पाचू नीलमची गुंफण
इथे जाहला नील सुंदर कण कण

नीलयम सदने उंच शिखरे तयाची
खगांची विहारे निळ्या या आकाशी
निळे चांदणे निळ्या स्वप्नकोशी
निळी मदमस्ती निळी मदहोशी

ना संपो कधी नवलाई निळ्याची
निळ्या रंगी राधा नि मीरा बुडावी
निळ्या जाहल्या भावना नीलपंखी
निळे सूर पाव्यातुनी घुमताती

दि. २०/०७/२१
सकाळी ०९.३२ वा.



## (३५)
## सर थेंब मोतीयाची

थेंब ओघळून आले
जरा विसावण्या इथं
झडलेली पालवी न
झाड ओसाड वाकलं

त्याचं दुःख कुणा कळे
पानगळल्या जखमा
तनु शृंगारली कधी
आता उरलेल्या खुणा

आल्या सवयीनं सरी
खुली झाडाची ओसरी
जरा भकास उदास
त्याच्या पानोपानी चरी

मग रूप मोतीयचे
थेंब थेंब पांघरून
झाड लगडून गेले
थेंब थांबून रमून

एक इटुकले पान
ऋतू मागचा लेऊन
नव्या चांदण्यांच्या नभी
गेले चिंब ओलावून

सर पाण्याची पाण्याची
सर थेंब मोतीयाची
सरसर सुख आले
बरसात चांदण्यांची

दि. २५/०६/२१
रात्री १०.४९ वा.



## (३६)
## हिरवं तारुण्य

रान बहरून आलं
पीक डवरून आलं
हिरवं तारुण्य लेऊन
रानामंदी गुज गेलं

तिची मलमल मऊ
हात हळुवार लाऊ
रेशमाच्या शालूमंदी
वधू वसुंधरा पाहू

कशी सजलीधजली
बीज उदरी रुजली
कवळ्या जावळाची बाळं
तिच्या कुशीत निजली

खोडकर अवखळ
पात्या करी सळसळ
वाऱ्यासंगे उडतील
नवे पिक परिमळ

एक वाट की धाकुली
हिरवाईनं सजली
लाज लाजेनं लाजली
दवातून भिजलेली

असं पिरतीचं रान
फुलू दे ना रं शिवार
सदा हिरवळ राहो
राहो तुझीच बहार

मलमल मीही राजा
तुला सुखावण्या झुरे
रेशमाच्या नात्यासाठी
मन दुलई पांघरे

दि. १७/०७/२१
रात्री १०.३७ वा.




## (३७)
## थेंबराण्या पावसाच्या

चिंब पावसाच्या घरी
सारं ओलं ओलित्याचं
वर आवाज गगनी
चाले दळण जात्याचं

पात्या घरघर नभी
घासघासुनी फिरती
वीजबाई हो तोऱ्यात
अशी मधे चमकती

सरी दळण पडतं
शुभ्र पाणी ते सांडतं
आता बुजलेलं बीज
खेळ उगवी मांडतं

कोण म्हातारी काळाची
धनधान्य सर्गाची
सोडी गठडी पाण्याची
झुंज काळेत्या ढगांची

घ्याना भरून भरून
गोण्या गारा पावसाच्या
आत मनात साठवा
थेंबराण्या पावसाच्या

दि. १३/०७/२१
दुपारी ०४.१७ वा.



## (३८)
## पुन्हा गुंतलो थेंबांमधुनी

त्या पाऊस धारा वेचून गारा
रमलो मी जेथे
घर ते माझे अंगण वेडे
भिजते अजूनही येथे

ढग पिंजारले वर आभाळी
छटा पसरली काळी
एक अनामिक ओढ खेचुनी
नेतसे मजला निराळी

उनाड वारा श्रावण सारा
ओंजळीत भरताना
पिऊन थेंब मी घेऊन गारा
एकमेका मारताना

खाऊन गारा सवंगड्यांची
मस्तीत धमाल चाले
त्यावेळी मज थेंब थेंबही
गुज कानातून बोले

आज किरकिरा झालो मी तर
कशास पाऊस आला
कामावर मी जाण्यासाठी
होऊन गेलो ओला

विसरून गेलो बालपणीचे
ऋतू अंगावर झेलून
जीव इवलुसा परी आनंदा
डोंगराएवढे पेलून

पुन्हा गुंतलो थेंबांमधुनी
धारा मनी कोसळल्या
गावाकडचा घर ओलावा
गंधकळ्या उमलल्या

दि. २२/०७/२१
सकाळी ०८.१३ वा.




## (३९)
## हिरवी गाणी हिरव्या ऋतूची

झुलती झाडावरील झोके
सरोवराचे चुकतील ठोके
परी गोजिरी अधांतरी अन
रम्य चालती ते हिंदोळे

मत्स्य राणुल्या होती गोळा
रंगीबेरंगी चंचल चाळा
तिच्यासवे ते बोलून घेण्या
आटापिटा बघ त्यांचा सगळा

वरून वाकल्या फांद्या कणखर
पालवी नाजूक हिरवी सुंदर
अंगावरती झोम्बु देती
जिवास झुलवीत अंबरी झुंबर

तिकडून आली लाट धुक्याची
शिरशिर शिरवे गगनावरती
हिरव्या गगनी सरोवराची
हिरवी गाणी हिरव्या ऋतूची

पाऊसधारा श्रावण प्यारा
मनास देई सदा दिलासा
कुठेतरी मन रमून जाते
कधी लाभता असा किनारा

दि. २७/०७/२१
रात्री ११.४१ वा.



## (४०)
## भुई अंकुरत आहे

एक डोंगर उभा की
होऊन युगे दाता
वरुणाला अडवितो
बनून त्याचा भाता
भात्यात विसावले
शर येती सर सर
इथं युगंधरेवर
वर्षाराणीचा सत्कार

कुठे कोसळे माथ्याशी
पाणी मुसळधारेने
आल्या पाण्याला दे वाट
डोंगर गा त्वरेने
विखुरलेल्या पाण्यास
एक मार्ग मिळे छान
खळखळून वाहतो
एक स्रोत होई सान
जसजसे येत जाई
पाणी पुढे वाहताहे
देण्याच्या गुणधर्मे
धबधबा हो महान

कर्तृत्व डोंगराचे
परि लोभ ना किंचित
जलजीवन तो देई
न राहण्या वंचित
पाण्याला अमृताची
चव येई हो त्या क्षणी
गोड, मधुर ते पाणी
चिर राहे अंतर्मनी

खेळे अल्लड ते कोणी
चिंब ओल्या बालपणी
जलक्रीडा त्या यौवनी
धुंद साजन सजनी
जिणे निसटून जाते
वाटे तीरी वृद्धपणी
कोणा काहीही वाटावे
पाणी पुढे वाहताहे
मग राबत्या हातांनी
भुई अंकुरत आहे
पाण्याचा होई दाणा
मुखात जातो जेव्हा
डोंगर, धबधबा
कृतकृत्य होई तेव्हा

काय सांगतो डोंगर
जे आहे सारे द्याना
देण्यात सारा आनंद
एवढंसं समजून घ्याना
दाता राहतो अढळ
उंच डोंगरासारखा
दानाचे पुण्य होऊन
होई दुःखाला पारखा

सारं देऊन डोंगर
होई सौंदर्याचा घाट
दनाने मिळे मान
सारे विश्व पाही थाट

७/१२/२०२३,
०८:१९



## (४१)
## दिवा होऊन जगावं

एक रम्य ही पहाट
सुर्व्या बगा उगवला
रंग लेऊन सर्गाचे
चित्त जागवण्या आला

पक्षी किलबिलती
झेप घेत आकाशी
झाड डोले आनंदाने
रेखी एक रम्य नक्षी

एक रंग दुजामध्ये
मिसळतो असा काही
माझ्या देवाच्या कलेला
कुटं कुटं तोड नाही

आदित्य देवा रोज
हात जोडते नमून
चैतन्यचं सांडतो हा
न चुकता येऊन

राती डोळा लागे डोळा
प्राण होती कुटं गोळा
न्हाई शुद्ध तवा कोणा
रोज नभी ये पाहुणा

कधी कार्याला ना चुके
सारे तेजापुढं फिके
बरम्हांडातुन फिरता
नाही होत कधी रिता

रोज दिसतो म्हणून
जिती जागती माणसं
त्यो नसलं तर हो
सांगा ओसाड रानंच

अशी सुंदर पहाट
देवा बघावी की सदा
माझ्या घरा दाराला रे
देई आशीस समदा

आणि काय मागू तुला
देवा सुर्व्या तू तेजाळ
कष्ट करून जगावं
नगं मोहाचं हे जाळं

मला एकंच कळतं
तुझ्या वानी मी वागावं
देत परकाश साऱ्या
दिवा होऊन जगावं

७/१२/२०२३,
०८:१६



## (४२)
## कोमल कळी

हक्क कळीचा फुलण्याचा
दवबिंदूंवर झुलण्याचा
दवास वाटे ते झुलते
हळूच कळीचे... फुल उमलते

आकाशाशी नाते जडते
भुईला फुलाचे स्वप्नची पडते
स्वर्गामधुनी वरुणराज हा
गुंफत जातो माळ अहा...

बिंदू बिंदू चमकत जातो
कामदेव हा दबकत येतो
कळीस तेव्हा उलगडते मग
तारुण्याचे नवखे हे जग

धुंद बिचारी नव्या विचारी
गालामध्ये लाजत जाते
फूल पाकळी रेशीम ल्येते
शेला तलम ओढून घेते

एक अनामिक भुंगा तेव्हा
गुंजन करतो तिच्या भोवती
दुरूनच ऐशा लाडिकभावे
हृदयभावना त्यात गोवती

दवबिंदूंनी आणले शहारे
रोमांचित तिज करती सारे
क्षणभर नयना मिटून घेता
भुंग्याला ती कोशी पहाते

अशा क्षणाला अबोल तीही
अबोल भुंगा, दिशाही दाही
एक सोहळा सुगंध देतो
धरणीला स्वर्गाशी नेतो

नाजूक ललना कोमल कळी
हसू उमटले गाली खळी
भुंगा नाजूक इतका झाला
फुलून आली कळी पाकळी

७/१२/२०२३,
०८:२०



## (४३)
## आभाळ भरू येई

आभाळ भरू येई
कधी वेळी न अवेळी
ते बरसंत नाही
प्रत्येक अशा स्थळी

ते नभी भरू येता
इथे आस जागी होते
माणसाच्या स्वप्नाची
भुई ओलिचिंब होते

एक पिसाटसा वारा
जल भरल्या मेघाला
पिटाळण्या वाहताहे
आस तो तो धरणीला

मोठया आवाजी गर्जून
ढग वाऱ्याला विचारे
तुझे वागणे कसे रे
ढग पळाले बिचारे

वीज कडाडून रागे
दात ओठ खात राही
तिळपापड अंगाचा
चमकता लाही लाही

भुई वाऱ्याला विनवी
शांत राहा बाबा थोडा
कित्ती मास उलटले
इथं चातक कोरडा

माझ्या काळजाला भेगा
हरपली वनराई
बरसू दे त्याला मुक्त
कण कण ओला होई

ओल्या माझ्या या मातीचा
गंध वाहण्या तू येशी
माझा आनंदही सवे
ने रे मग दूरदेशी

येता पावसाची धार
रान होई हिरवंगार
दाणा पिकंल जाणुन
पक्षी थाटतो संसार

जीव जीव सुखावतो
तृप्ती मनात जागते
माय होऊन धरणी
पान्हा आनंदे पाजते

बरसून मेघराजा
आभाळाला खाली आणी
मोद मनीचा आभाळी
पाहताच वृष्टीपाणी

भुई आभळची होते
होते आभाळही भुई
असे एकरूप होता
मोर नाचे थुई थुई

मोर नाचता वनात
पिस गालावरी फिरे
सृष्टीच्या सोहळ्याचे
साक्षी होती सारे सारे

आता आभाळ भरते
माझ्या मनाच्या आकाशी
बरसून तुझ्यावर
उरतो मी गंधकोशी

दि. २३/६/१९
वेळ रात्री ९ वा.



## (४४)
## अन् पंखातून उमेद भरता

ही भरारी नजर करारी
अदा ही माझी उडण्याची
या पसरल्या पंखातून मज
कवेत सारे भरण्याची

रंग कोणते आकाशाचे
निळ्या पांढऱ्या शांत छटेचे
चोच इवलुशी टोकदार ती
खेळ सावजा टिपण्याचे

उडता उडता फांदीवरती
क्षणभर टेकून बघतो मी
आकाशाच्या अथांगतेला
पंखामधुनी मोजतो मी

या धरतीने लेकुरापरी
मायेने मज वाढविले
अंगाखांद्यावरी खेळवून
प्रेमभराने लाडविले

आकाशाने दिली केवढी
अनंत मजला स्वप्ने अशी
अन पंखातून उमेद भरता
नवीच दृष्टी मिळते जशी

मजला लाभले सौंदर्याचे
रूप देखणे खग अनुपम
जगण्याचे हे माझे मोहक
तंत्र भुलवीते मानवजन

असाच उडूनी पुन्हा धरेवर
निवांत बसुनी घेईन श्वास
सदा टेकणे मायभूमीवर
उडण्याची जरी अंतरी आस

तिच्याच आकांक्षांचे भरते
भरुनी पंखी या मी विहरी
मनात माझ्या कृतज्ञतेने
तिच्यासाठी उठती लहरी

हे मायभू तुझे पांग फेडणे
अशक्य असते जन्मभरी
केवळ मी तर तुझ्या वत्सली
विनम्र राहो वरचेवरी

दि. २६/०८/२१
सकाळी ०७.४४ वा.



## (४५)
## झुंजूमुंजू झालं

झुंजूमुंजू झालं
पाखरानं गाणं गाईल
आभायानं उघडून दार
पृथ्वीकडं पाहिलं

आलो अगं घेऊन खऱ्या
रंगांच्या मी छटा
उठ गं सखे जागवाया
मधुर सुरावटा

येईल बघ अरुण रथी
घेऊन सुर्व्याला
लाल केशरी रंगांचा
इथं गलबला

हळू हळू सोनकिरणं
अंगावर तुझ्या
उठली माझी सृष्टिराणी
जागवतोय राजा

पहाटेला रंग थवा
पसरला जवा
मोरपिशी आभाळात
कृष्ण घननिळा

धरा होई राधा आणिक
रास क्षितिजाला
कोडं गोड उलगडं
सृष्टीभर लीला

दि. ०९/०७/१९
स. ०६:०५



## (४६)
## क्षितिजावरची लालिमा

क्षितिजावरची लालिमा
सरोवरात बिंबिली
आकाशाने पहाटेला
हळूच धरणी चुंबिली

लाजली ती लाजली
क्षितिजापाशी थांबली
लाल लालेलाल गाल
पाण्यात लपवू लागली

धुऊन घेता जळामध्ये
कपोललाली उतरली
धरा अजूनच क्षितीजाच्या
कुशीत लपून बावरली

त्यातच बिंब नारायणाचे
प्राचीवरती अवतरले
निद्रेत गुंगल्या विश्वाला
प्रेम तयांचे हे कळले

अशा लाघवी प्रणयवेळा
रोज सकाळी धरणीला
निशा कुशीतून उठवत येतो
आभाळसखा बघ तरुणीला

ती बघते, उठते आपुलकीने
त्याचे स्वागत करण्याला
सृष्टी रंगते त्या दोघांच्या
रम्य गोमट्या मेलनाला

जाग जागला शुभ्र पतंग
शोधत हंसी राजहंस
तिच्या मीलना उत्सुक तो की
अशा वेळेला असीम दिगंत

झाडे जागली, पानोपानी
उत्फुल्ल तयांचे दिसती रंग
प्रतिबिंबाने दोन वाटती
सृष्टीराधा नभश्रीरंग

दि. २८/७/१९
दुपारी ३.२१ वा.



## (४७)
## गगनचुंबी वृक्षराजी

गगनचुंबी वृक्षराजी
पालवीने व्यापलेली
मार्ग धुतला नितळ झाला
वृष्टी त्यावर ओतलेली

आकाशाला गवसताना
तळ असावा स्वच्छ की
पारदर्शी मार्ग अथवा
भूमीतलही सावरी

हिरव्या हिरव्या रानी जातो
वारा कानी सांगतो
रथ कुणाचा मंद चाली
आज येथे चालतो

भूल पडते सृष्टीसाठी
गोडव्याचा सोहळा
वाट इथली सोडवेना
अन निवांत ह्या वेळा

मन जरासे बोलते ना
ते स्वतःशी डोलते ना
एकरूप होता जरासे
कळते सृष्टिमोल ना

एकट्याने जीवनाचा मार्ग
चालणे सुंदर
जगजनांच्या कोलाहली
व्यर्थ हेतू धूसर

चल पुन्हा स्वीकार पांथा
एकल्याने चालणे
ऐकशील मग तेव्हा तुही
रानसृष्टी बोलणे

दि. २३/७/१९
सकाळी ९.२६ वा.



## (४८)
## येता पावसाची सर

येता पावसाची सर
चिंता सरते की दूर
माझा बळीराजा धावं
शेतामंदी भरंभरं

शेत नांगरून झालं
आता पेरायाचं बीज
सर्जा राजा गणप्या हणप्या
लगबगीनं निघालं

न्याहारीची सय न्हाई
शिवारात लगीनघाई
आज धरती न्हातीधुती
गंध लेऊन सजली माती

बळीराजा गा खुशीत
खुशहाली त्यो पुशीत
बाप आभाळाचं रिण
बीज धरणीकुशीत

नांगरल्या शिवारात
कुटं चालली पेरणी
बीज बीज रोप होई
माझं मन हो धरणी

बीज मातीखाली जातं
सारं सपान फुलतं
बीज अंकुरण्या आधी
मन पिकाशी डोलतं

बैलजोड्या राबत्याती
माझी पोरंच ती हायती
साथ त्यांची या जीवाला
कशी जीवापाड नाती

दिनरात माझ्यासंगं
राबतोया शिरीरंग
नंदी शिवाचा बी दंग
कष्ट सुरात सारंग

त्याच्या कष्टाची बासुरी
आली घेऊनिया सरी
राग सरींचा मल्हार
त्यात लपली बागेश्री

हिरवा शालू भरजरी
तिच्या रूपा तरतरी
आता सर्गाची ही तोड
शेत लक्ष्मी श्रीहरी

तिची किरपा घरीदारी
पसा पसा धान्य भरी
कणग्या भरून पावल्या
सुपात मुठी आल्या

जात्याचं चाक फिरलं
ओवीनं सुरा धरलं
पीठ परातीत मळता
दैन्य भूकेचं सरलं

चूल आज तेजाळली
भाकर तव्यावर आली
माझ्या कारभारणीची
खुशी फुलूनिया गेली

घरादाराच्या ताटात
घास मोतीयाचा आला
थेंब घामाचे गळता
चंदनाचा वास आला

अशी देवाजीची किरपा
साऱ्या माणसांवर ऱ्हावी
मिळो कष्टाची भाकरी
इडा पीडा दूर व्हावी
इडा पीडा दूर व्हावी.

दि. १/७/१९
दुपारी १२.४५ वा.



## (४९)
## इंद्रधनू शेतात

इंद्रधनू शेतात उतरले
झोपडीवरी रंग पसरले
आज गरीबाघरी दिवाळी
तीपण साजरी होत सकाळी

वसुंधरेचा हिरवा पिवळा
पोपटी असा शृंगार पाहण्या
इंद्रधनूला मोह जाहला
मोहित तो तिज स्पर्शून घेण्या

आकाशाशी नाते तिचे
इंद्रचापाने रेखीयले
सप्तरंग उधळून मस्तीने
तिला गुलाबी अधिकच केले

डोंगर हिरवे रानोमाळ
शेते पिकली ती अळमाळ
रंगांचा गोडवा मिसळला
रंगीत मिश्रण दिसे कमाल

श्रावणातले चित्र देखणे
स्वर्गामधला चित्रकार
रंग तयाचे कधी न संपती
रंगसोहळे वारंवार

काळ्या काळ्या जमिनीमधुनी
रंग बहरती फुलाफळातून
निळया निळ्या आकाशातून
रंगछटा जातील पसरून

इंद्रधनूची कमान जणू ती
स्वर्ग पृथ्वीचे विवाहमीलन
सूर सनईचे सृष्टी छेडते
मंगलाष्टके शेतातून

पडती अक्षता धरित्रीवरती
बीज होऊनी त्या फळती
अन्न ब्रह्माचे आशीर्वाद
क्षुधाशांतीतून मग मिळती

असे देखणे चित्र हवेसे
श्रावणराजा दाखवतो
उत्सवनांदी पृथ्वीवरती
संवत्सरभर राबवतो

दि. २४/७/१९
दुपारी १.११ वा.




**(५०)**

**रत्नमाळ ही**

झुडूप काटेरी
आज दिसतंय चंदेरी
काय किमया झालीया
दिस पुनव ल्यालीया

आभायातल्या चांदण्या
जरा फिराया आल्यात
पावसाच्या सरीसंग
चांदण्यात नहाल्यात

गोऱ्या गोऱ्या गालावर
खळी दवाची पडलीया
साडी काट्यात रुतून
सोडविण्यास अडलीया

काटा शहारून आलाय
हिव अंगामंदी भरलाय
दव राणीच्या संगतीनं
काटा बोचायचं भुललाय

सर सरसर बरसून
उगा निवांत बसलीया
एका काटेरी झाडावर
रत्नमाळ ही कसलीया

दि. २/७/१९
रात्री १०.०३ वा.



## (५१)
## धुक्याची चादर आली

धुक्याची चादर आली
धरा ही अर्धओली
पाहता दिसते काय
दृश्यं अदृश्य झाली

झाडावेलींवर हिमकण
फुलांवर दवबिंदूनक्षी
पाकळी यौवनात हसता
आनंदाचे भरते वक्षी

वाकते वेल लाजूनी
दवाच्या थेंबांचे भार
स्पर्श हा कोमलतेसव
अंतर्बाह्य गाऽऽर गाऽऽर

नभाला भरते येते
भुईवर प्रेमवर्षाव
धुक्याच्या तलम वसनाचा
पडदा हो त्याला अटकाव

लज्जेने चिंब ओऽऽली
धरणी ही आज झाली
वस्त्र ओढता धुक्याचे
उमटली गाली लाली

लाजणाऱ्या प्रियेला
गोड उपहार आणला
माळ मोत्यांची गळ्याला
प्रियतम अजून भाळला

प्रियकर प्रेयसी तेच
नव्याने भासती आज
शहारते अंग प्रत्यंग
लेऊनी लाजेचा साज

लावण्य कुठे दडले
प्रश्न मनाला हे पडले
रोजची धरा असूनी
अवचित असे कसे घडले

धुक्याने हळूच दूर केला
भवतीचा फापट पसारा
नजिकचे शिल्पसौंदर्य
अलगद येई आकारा
अलगद येई आकारा

दि. २८/६/१९
सकाळी ९.३२ वा.



## (५२)
## रान हिरवाई मंदी

रान हिरवाई मंदी
माझं झोपडं सुरेख
पुढं नदी वाहताना
प्रतिबिंबाला तू देख

झाडं डेरेदार उभी
देण्या सावली गडद
सुरामंदी पक्षी गाती
ऐक किलबिल नाद

गवतानं अंथरला
पायी गालिचा हिरवा
सुख स्पर्श त्याचा होता
मऊ लागतो गारवा

अंगावर धरणीच्या
भरजरी शालू आला
हिरव्या कंच मऊशार
धाग्या धाग्यानं विणला

सोनसळी ऊन येता
हिरवळ चमकते
भुई अंथरले तण
तरारून दमकते

शेत पिकल्या रेघात
सरळपण ते ओघात
वाट वाकडी कशाला
निसर्ग न माणसात

शांत निवांत पाण्यात
होडी ढकलावी आत
सृष्टीसंग विणू या की
घरटं सुगरणी नातं

दि. ५/७/१९
सकाळी ७.३७ वा.



## (५३)
## जीव लागलेत टांगणी

काळ्या निळ्या आभाळाची आज
नियत दिसत नाही चांगली
धरेला धरलंय धारेऽऽवर
जीव लागलेत टांगणी

धारा मुसळाच्या फेकतोऽऽय
गारा टपोऱ्या मारतोऽऽय
गडगडाट कर्कश्श करुनी
विजेचं चाबूक ओढतोय

आज गड्याची दिसतेऽऽऽय
मर्जी खफाऽऽऽऽ
वाराही वाहतोय
सुसाऽऽट अस्साऽऽ

ढग उरलेत धरणीवर
योद्धा सैनिक ऐरणीवर
आभाळ फुटलंय तुफान सुटलंय
जोराऽऽचं पाणी पृथ्वीवर

आवरू कसं सावरू कसं
रडून पाणी वाढवू कसं
वाहिलं रे वाहिलं रे वाहिलं साऽऽरं
जलमय जलमय झालं बरंऽऽ

येवढाऽऽ राग, पाहिलाय आज
ढगापुढे ना कुणाचा आवाज
संकट असलं आणलंय की
निसर्ग कोपा मानलंय की

माणसा माणसा शहाणा हो
थांबव ऱ्हास चाललाय जो
निसर्ग मैतर होशील तर
सुखात झेलून घेशील सर

दि. ४/७/१९
सायं. ६.१० वा.




## (५४)
## पत्र्याच्या छतावरून

माझ्या पत्र्याच्या छतावरून
धारा पावसाच्या कोसळती
जलपडदा सळसळतो
विटा उन्हाच्या ढासळती

घर अंगणाला पाहतं
स्वच्छ न्हातं धुतं होतं
धूळ साचलेलं मळकट
पाऱ्यावाणी चित्र होतं

पडदा पाण्याचा हलतो
वारा धारेशी खेळतो
अंग चोरट्या लाजेनं
बुजऱ्या प्रियेला पाहतो

पडदा अवखळ राजस
हळू आत डोकावतो
रूप भिजलं निरखाया
खट्याळ रोज सोकावतो

घर राजसीला माहीत
त्याचं चोरून पाहणं
नजरेत तिला भरूनी
दृष्टिसुखानं वाहणं

छतावरच्या भांगातून
काळ्या भुऱ्या कुंतलातून
प्रीत धारेचा शेंदूर
टप् टप् मंत्रांचा उच्चार

ढोल ढगांचा वाजतो
नवरा पावसाचा सजतो
वाट पाहून थकलेल्या
सदन नवरीला भिजवतो

झाडं वेली फुलं पानं
आले वऱ्हाडी सजून
वीजबाई चमकून
घेते सुनमुख पाहून

पावसाचा लगीन सोहळा
देव ढगातून गोळा
धार फुलांचा वर्षाव
गळा गंधसूत्र घाला

धरती नटून हिरवाईनं
शालू पाचूचा लेवून
विहीण पंगत वाढली
फुलं रांगोळी काढली

धरणी विहीण गाऊन
लळा लावण्या विनवून
सांगे पाऊस जावया
प्रेम द्या हो बरसून

तुमचा वियोग न व्हावा
सुखानं करावा संसार
धान्य लक्ष्मी भरल्या
अर्धांगिणीला आधार
अर्धांगिणीला आधार

दि. ६/७/१९
दुपारी १२.३५ वा.



## (५५)
## का असा कोसळतोय

आज पुन्हा वेडा झाला पाऊस
तू भेटलीच नाहीस
का असा कोसळतोय
आतून सारा ढासळतोय
खबरबात तू काही
घेतलीच नाहीस

किती वागला शहाण्यासारखा
शांत रिमझिमला
हवा तेव्हाच हवा तितकाच
संयमानं गुणगुणला

तिने दखल घेतलीच नाही
खिडकीतूनही वाकलीच नाही
छत्र घेऊन का होईना
एकदा बाहेर यायचं होतं
दोन चार थेंबांना
अंगावर झेलून घ्यायचं होतं

ठरवलंच तिनं भिजायचं नाही
काहीही झालं तरी
उनाड वागायचं नाही
दुरूनच पाहिलं तर पहायचं
त्याचं आभाळ भरून येणं
झाकाळून आसमंत
जरा उदास करून जाणं

त्याला काय माहीत
कोसळण्याशिवाय
मागे एकदा धुडगूस घातला
घरादारात घुसून बसला
राग इतका अनावर त्याचा
जाताना पूर होऊन बसला

रोजची ओळखीची
गुणी नदी
दुथडी भरून वाहू लागली
याचा जोर सरंतच नव्हता
पाण्यानं परिसर भरतंच होता
हा वेड्यासारखा बरसून गेला
आईचा संसार वाहून गेला
नुसता संसार, भांडीकुंडी
चीजवस्तू गेल्याही असत्या
माणसं एक होऊन पुन्हा
साऱ्या मिळवल्याही असत्या
आई गेली रे ...
तुझ्या बेभान बरसण्यात
आभाळ फाटलं बघ
तेव्हा एका क्षणात

तीही बरसायची
प्रेमानं अविरत
दुधाचा पूर यायचा रे
पदराखाली मला सांभाळत
तिच्या पुरानं जीवदान दिलं
अंगात बळाचं इमान आलं

अन तू असा आलास
हैवान झालास
थैमान घालत
तिलाच जगातून
घेऊन गेलास

मग पुलाखालून
पाणी गेलं
मायेचं भरतं वहायलं
उर फुटून त्या दिवशी
तुझ्यापेक्षा जास्त बरसले
काकुळतीच्या स्वराने
आईसाठी तरसले

आता ती नाही
घराला घरपण नाही
आता कुठून भिजायचं
तिच्या आठवांनी
भरलेल्या डोळ्यांना
तिच्याच विणलेल्या
गोधडीत दडवायचं

म्हणून आता पाऊस
मला आवडत नाही
संथ बरसलेलाही
वेड्यागत कोसळलेलाही

दि. ८/७/१९
सकाळी ९.५ वा.



## (५६)
## मेघ होऊनी दूत बोलल्या

मेघ होऊनी दूत बोलल्या
भावप्रीतिच्या धारा
हृदयामधला मंद वाहिला
संस्कृतातुनी झरा

प्रेमकाव्य हे अतुल्य ऐसे
कवी न त्यासम दुसरा
कालिदासाच्या आषाढातून
नित्य वसंतही हसरा

भुलले मन भुलली सृष्टी
विरहप्रीतीची गाथा
देववाणीच्या शब्दप्रभूपुढे
नमवू अवचित माथा.

७/१२/२०२३,
०८:३२



## (५७)
## दुतर्फा झाडांची दाटी

दुतर्फा झाडांची दाटी
रस्ता रमणी ही शेलाटी
पलीकडे नितळ तळी शांत
परिसर रम्य एकांत

वाटते इथे थांबावे
क्षण थोडे जगून घ्यावे
प्रतिबिंब तळ्यातील स्वच्छ
हे चित्र मनी रेखावे

रस्त्याच्या कडेला रांगोळी
लुसलूस नरम गवताची
ताजे तवाने होऊन गावे
त्याला संगती घेऊन जावे

ही पृथ्वी अशीच रहावी
हिरवाई सजून जावी
थकलेल्या जीवांना
दृष्टी चैतन्य मिळावी

सृष्टी ठरते प्रभावी
मुठमाती दुःखा द्यावी
जन्मून नव्याने येथे
नवनवी सुरुवात व्हावी

श्वासात ताजेपण घ्यावे
आपणंही निसर्गच व्हावे
क्षणभर चित्रासम येथे
स्थिर शांत निवांत रहावे

दि. ७/७/१९
रात्री १०.५७ वा.



## (५८)
## उन्हं पांघरून रान

उन्हं पांघरून रान
पुन्हा नवं की झालंया
सोनसकाळ आलिया
मन सोनेरी झालंया

कवडसा आधी आला
आली उषा त्याच्यामागं
तिनं पायघोळ झगा
नेसला की झगमग

रातीचा त्यो अंधार
झाला गुडूप कवाच
एक आशा संगतीनं
तिनं आणली मनात

झटकून आळसाला
रान लागलं कामाला
वनचरे निघाले की
घास गोड शोधण्याला

पान पान जागं झालं
सळसळून डुललं
वेली राण्या झाडासंगं
संसारी फूल आलं

झोपलेलं रान व्हतं
किर्रर्र किड्यांच्या सुरात
आता सुर्व्या बघून
पक्षी गायन भरात

एक चैतन्याची लाट
आली तनात मनात
दूरवर नारायण
तरी रोज अंतरात

दि. १०/१०/१९
सकाळी ११.३० वा.



## (५९)
## ही बुचाची फुले

ही बुचाची फुले उमलली
की रानाची दिवाळी
शुभ्र तेजोमय पुष्पदीप
वनराईस देती झळाळी

हिरव्या पानांमध्ये पहुडली
बाळकळ्यांची दाटी
झाड झुलविते झोका त्यांना
वारा येऊन पाठी

कधी वाटते आकाशाने
रंग जरा बदलला
निळीनिळाई सोडून त्याला
हिरवा नादची जडला

उंच उंच थांबून लटकून ते
थोडे थकून गेले
धरणीच्या कुशीमधे येऊनि
पान पान हे झाले

पाठोपाठ आकाशाच्या त्या
चांदण्या साऱ्या आल्या
गंधाळून किती धुंदीमध्ये
फुले नव्याने झाल्या

रूप देखणे चमचम होते
केवळ प्रकाश थोडा
फूल झाले अन तेजासोबत
परिमळ तनी सांडला

दूरदूरच्या अशा चांदण्या
कधी ना हाती आल्या
फुले जाहल्या झाडावरूनी
सडा टाकुनी गेल्या

अलगद त्यांना वेचीत असता
सुरभित अंजली माझी
अशा चांदण्या घेऊन हाती
आकाशाशी नाती

ही बुचांची फुले आज की
आनंदाने न्हाली
झाडावरती खुलून बिचारी
मनात उजळून गेली

अशी फुलांची फूलदिवाळी
रोज वनी घडते
सुगंध पसरीत अंधारातून
तेजप्रभा सांडते

दि. १७/१०/१९
सकाळी ७.४१ वा.



## (६०)
## गवतफुलांशी बोलून आले

गवतफुलांशी बोलून आले
काल तिन्ही सांजेला
डोलून, डवरून सांगून गेले
गुज मनीचे मजला

रोज सकाळी उन्हात भिजूनी
शक्ती नवी घेता
दिसभर चैतन्याशी आम्ही
सदोदित खेळता

कधी ही आमुची रानफुले
तर कधी तुरे उगवती
उन्हं, सरी पावसाळी आणिक
शिरशिरी थंडी घेती

दिसभर सूर्य जसाही फिरतो
त्या उन्हासवे उजळतो
वाऱ्यासंगे डोलून डोलून
रानाशी बोलतो

कधी उन्हाशी लपाछपी
तर कधी वाऱ्याशी गप्पा
कधी देतो मग इवल्या फुलाला
हळूवारसा धप्पा

असे कितीसे वेगवेगळे
खेळ आम्ही मांडतो
ना रुसतो ना फुगतो
आम्ही नाही कधी भांडतो

गवतपाती ही आमुची आई
'खाऊ' आम्हाला देते
तिच्या अंगावर हुंदडतो, ती
मस्ती साहून घेते

सायंकाळी तिच्या कुशीतच
अलगद पहुडताना
स्वप्नातही ती थोपटते
गीत अंगाई गाताना

आम्हीही जगतो क्षणाक्षणाला
चिंता उद्याची नाही
जगणे दुसरे काहीच नसते
क्षणास फुलवत जाई

गवतफुलांचे गूज जाणुनी
मीही नव्याने शिकले
चिंता काळज्या सोडून देऊन
गवतफुलांचे ऐकले

आता मी सारे ऋतू पाहते
सेवा मज करताना
सृष्टी सारी सुखसोहळे
माझ्याचसाठी भरताना

दिलखुलास माझे हसणे, बसणे
आणिक जगणे आता
मी हलके हलके गवतफुलासम
होऊन जगणे आता

दि. २४/११/१९
सकाळी ०८.११ वा.



## (६१)
## पृथ्वीवरती स्वर्ग उभारेल

ही नाजूकता अशी दिसावी
फुला पाकळीतून उमटावी
तलम पारदर्शी इतुकी की
थेट मनाला भिडून जावी

मन हलके हलके हे भावुक
दुजा मनाशी होत एकरूप
चेतन कोणी असो अचेतन
क्षणात होऊन जाईल समरूप

नाजूकता इतकी ते घेईल
कुठेतरी जरी दुःख कुढेल
या हृदयातून ऐक हुंदके
स्वतः ते बघ इतके रडेल

कधी कुणी असता समाधानी
ढेकर देईल मन अभिमानी
आनंदाने उठती फवारे
तुषार इकडे, शीतल वारे

कुणी न सांगता कळेल सारे
व्यथा असो वा मोद भरारे
जगणे परके नसेल तेव्हा
एकदिलाचे अनुभव व्हा रे

ही नाजूकता पाषाणाच्या
छाताडावर नाचनाचूनी
पाझर फोडेल, तो वितळेल
द्रवुनी तयाचे मन विरघळेल

असुर भावना जाय लयाला
सुरवर माणूस इथेच होईल
हृदयपाकळी कोमल कळी
पृथ्वीवरती स्वर्ग उभारेल

दि. २६/११/१९
सकाळी ६.०३ वा.



## (६२)
## हिमगौर पर्वताने

हिमगौर पर्वताने
पांघरून नीलवस्त्र
नभ निलायम वरती
निलकांती ही सर्वोत्तम

हा खंड चित्राचा काही
अथवा हे शिल्प अतुल्य
शीतलता अंगावरती
सौंदर्य असे हे अमूल्य

या निळ्या पांढऱ्या छटांनी
कोवळी सकाळ पाहताना
तो सूर्यही अडखळतो ना
वसन उषेचे विणताना

हे उंचवटे पृथ्वीचे
की नजरसुखाचे भाग्य
रजत निळाई तिजला
बहाल करती सौभाग्य

मी कुठे मनाला ठेवू
की वर गगनाला पाहू
अथवा नभांगणातून
सुंदरता साठवून घेऊ

शब्दही पडती अपुरे
ही सुरेख सुरगोपुरे
वर्णिण्या प्रतिभा कोठे
कुंठित सामर्थ्ये सारे

दि. ३/१२/१९
सकाळी ६.४१ वा.



## (६३)
## आकाशाने भाळावरती

आकाशाने भाळावरती
केशरी टिळा रेखिला
रोज प्रभाती सृष्टीने
अध्यात्म उदय देखिला

अजून कोवळा सूर्यबाळ हा
रंग गोजिरा लेऊन
अष्टगंध जणू उधळीत चाले
रक्तचंदने घेऊन

ब्रह्मचर्य हा पाळत असतो
संन्याशाची छटा
दिनमणी तेजप्रकाश घेऊनी
कांती देत एकटा

तहानलेला बाळ रवी हा
अर्घ्य प्राशितो अवघे
चंडप्रचंड ऊर्जेने ती
लाही काहिली होई गे

नजरेमधुनी साठवून त्या
देखदेखण्या बिंबा
एक तेज उदयते अंतरी
चैतन्याची गंगा

रोज पहाटे भेटून त्याला
नमन करावे नित्य
प्रकाशमय तो करतो जीवन
स्वागत व्हावे अगत्य

एक सूर्य बघ होता येईल
जिथे दाटली निशा
तळपत राहू पसरीत तेजा
मनी आशेची उषा

दि. ४/१२/१९
सकाळी ६.२९ वा.



## (६४)
## भुई झाकली

भुई झाकली हरिततृणाने
पोपटी हिरवा रेशीम शालू
स्पर्श तयाचा इतुका मऊसर
गोरीमोरी धरा लाजाळू

तिने ओढला वृक्षराजीचा
घनदाटी हा पदर मुखावर
तरीही लाडिक राजस तिजला
त्यातून वाकून पाहतो दिनकर

दृष्ट न लागो माझीच तुजला
इतुकी दिसशी गोड मोहिनी
मीही ऊब ही देत प्रेमाची
संयम राखीत येतो जवळी

उन्ह कोवळी अंगावरती
फिरतील राणी, तू रोमांचित
फुले शहारा मज अंगावर
मीही सदैव तुजला अंकित

रोज सकाळी प्रणय सांगतो
मी तुजला बघ अनुनयातून
तुझ्या पाठी मी चालत राहीन
उजळीत तुजला किरणावळीतुन

थांब सखे मज जाणून घे ना
तुझे सारखे संकोच हे ना
कसा किती मी अधीर राणी
तरीही मर्जी तव ओलांडीन ना

रोज तुझ्यावर प्रेम बरसवीन
कांचनतेजी मढवून टाकीन
तुही सुंदरी अलौकिक, मज
केवळ बघता मोहित मी रोज

असे आपुले युगायुगांचे
प्रेम पाहते विश्व आगळे
मी तुझा नि तू माझी सदैव
हे का सांगणे पुन्हा वेगळे

विश्व तुझे फिरे भवती माझ्या
तुझे हे असणे सुखावे मजला
ऋतुही सारे दिमतीला तव
चंद्र तारका मीही तुजला

दि. ५/१२/१९
सकाळी ७.५३ वा.



## (६५)
## झाडावरती झुंबर

खळखळून हसताच कळीचे
फुल एवढे सुंदर झाले
एक अनोख्या रंगांचे ते
झाडावरती झुंबर झाले

तिथे पेटले दिवे उजेडी
वाऱ्यावरती झुलती वेडी
अशी लावण्ये बहरा येऊन
मनास लावीत जातील गोडी

झुंबर हे की अतिशय नाजूक
स्पर्श कोवळे सुगंध साजूक
परमेशाची कलाकुसर ती
उद्यानातून जाऊ मोजुक

जो जो जवळी जातो आपण
खुलून येतील चैतन्याने
क्षणात आपण फुलून येता
खुदकन हसतील मोदभराने

आकाशाची घेत प्रेरणा
लटकून झुंबरे दिनकर निशिकर
हिरवी फुलझाडेही प्रेरित
लटकून फांदीवर कुसुमाकर

किती उत्सवांना ही सृष्टी
रोज मनवते रंगारंग
दृष्टी उघडून खुले करावे
दडून बसले अंतःकरण

दि. १३/१२/१९
सकाळी ६.३४ वा.



## (६६)
## वस्त्र धरेचे छान

फुले गुलाबी, फुले जांभळी
वस्त्र धरेचे छान
महावस्त्र हे देऊन तिजला
ऋतू करती तिचा सन्मान

रंगसंगती खुलवीत नेते
रूप तिचे अजूनच देखणे
वस्त्र असे नेसून मनभावन
तिने सुखाचे क्षण वेचणे

निसर्ग विणकर अतुल्य ऐसा
मास चार तो विणतो शेला
कशिदा काढून रंगरंगीला
सुवास ओतप्रोतही भरला

अशी संगती रंगांची की
परस्परांना शोभीत करती
कुठून एवढ्या छटा हा आणतो
पराग त्यातून तुरेही वरती

अशी नक्षी अन अशी जरदोजी
आकर्षक जरतारी किनार
इतुके सुंदर वस्त्र वेगळे
विलोभनीय ही दिसते नार

वेगवेगळ्या रंगफुलांच्या
साड्या, शेले, शालू खुमार
मस्त नटूनी नभदर्पणी ती
निरखून घेते निज शृंगार

स्त्रीच्या सौंदर्याला खुलवीत
तेजाळून वस्त्रालंकार
रूप देखणे पाहण्या प्रियकर
असे किती देतो उपहार

दि. २०/१२/१९
सकाळी ७.१५ वा.



## (६७)
## चित्र पहाटे उदयाचलीचे

पृथ्वी आप तेज वायू आकाश
पंचमहाभूतांचे विश्व
पृथ्वीवरती जल राहतसे
आकाशी तो तेजोगोलक

वायू यांच्या मध्ये फिरतो
दूत बनून सांगावे घेऊन
तिन्ही त्रिकाळी चित्र वेगळे
सौंदर्याला घ्यावे पाहून

तेज सांडते पाण्यावरती
पाण्याला सोन्याचा रंग
डोंगरा आडून वाकून पाहतो
धरा राहते त्याने दंग

असा खोडकर सूर्य रोजची
लपाछपी त्याची असते
एक न जागा साऱ्या दिशांना
तेज देण्याची घाई दिसते

रोज सकाळी तो दिसतो
जगण्याची जणू संधी तो
शांत पहुडता निशीसमयीला
चंद्राला तो पाठवतो

जगणे म्हणजे काही न दुसरे
या पाचांचा खेळ असे
वारा आकाशातून शरीरी
आकाशातच झेपतसे

तो आहे या शरीरी आपण
रोज भेटू या उत्साहाने
चित्र पहाटे उदयाचलीचे
नेत्री साठवू नवरंगाने

दि. २१/१२/१९
सकाळी ७.१६ वा.



## (६८)
## एवढे दमकू नका

सांगा दिव्यांना एवढे
गर्वात ते चमकू नका
चंद्र आहे आड लपला
एवढे दमकू नका

अंधार पाहून तेज तुमचे
लक्ख वाटे आज की
पण उद्या तो येईल घेऊन
चांदण्यांना संगती

त्या अशा लुकलूक करूनी
मिचकुनी डोळे बघा
गाली हसतील अन खिजवतील
तेज उसने घ्या जरा

रे दिव्यांनो तरीही त्यांना
मोद वाटे केवढा
उजळुनी अवनीस तुम्ही
टाकीला जो हा सडा

तेज पाहुनी येथले
त्या रम्य गप्पा रंगल्या
रंगात साऱ्या न्हाऊनी
कोणत्या या चांदण्या

त्या जळाच्या अंगणी
बिंब ते तारांगणी
नभ तिथे की या इथे
ती रोहिणी की रागिणी

तेज इतुके फाकले
आभाळ सारे वाकले
आज येथे त्या तमाचे
घरही झाले धाकले

गर्व नाही नाही आमुचा
हा असे अभिमानही
तो तिथे चमकेल चंदा
तेजाळलो येथे आम्ही

दि. १७/१२/१९
रात्री ११.११ वा.



## (६९)
## सृष्टीभर लीला

झुंजूमुंजू झालं
पाखरानं गाणं गाईल
आभायानं उघडून दार
पृथ्वीकडं पाहिलं

आलो अगं घेऊन खऱ्या
रंगांच्या मी छटा
उठ गं सखे जागवाया
मधुर सुरावटा

येईल बघ अरुण रथी
घेऊन सुर्व्याला
लाल केशरी रंगांचा
इथं गलबला

हळूहळू सोनकिरणं
अंगावर तुझ्या
उठली माझी सृष्टिराणी
जागवतोय राजा

पहाटेला रंग थवा
पसरला जवा
मोरपिशी आभाळात
कृष्ण घननिळा

धरा होई राधा आणिक
रास क्षितिजाला
कोडं गोड उलगडं
सृष्टीभर लीला

दि. ०९/०७/१९
स. ०६:०५



## (७०)
## दिव्य रूप सावळ्याचे

दिव्य रूप सावळ्याचे
त्याचा मुकुट आभाळी
सागरतळीची रत्ने
गुंफियली त्याच्या माळी

हात कटीशी ठेविले
त्यात दोन लोक मावले
भूलोकी विटेवरी
माझी विठाई माऊली

गगनाचे छत्र झाले
चंद्र सूर्य देवडोळे
किती नक्षत्रे नि तारे
त्याची सारीचं लेकुरे

अर्जुनाला युद्धस्थळी
दिव्य रूप दावीयले
आज माझ्या विठुराया
मीही तसेच पाहिले

बाप विठुराजा माझा
नाही आधार की दुजा
होता आकाश विठूचे
कण कण भासे खुजा

बरसतो कृपामेघ
वर्षावात चिंब होऊ
जन्मोजन्मीची पुण्याई
तीर्थ सेवनात घेऊ

तेजपुतळा सावळा
रंग सारे श्रीरंग
नाद भजनाचा तुझ्या
शांत मनाचा सारंग

दि. १०/७/१९
दु. ५:१७ वा.



**(७१)**

**लुकलूक गंधगोण्या**

माझ्या अंगणी तारका
मोगऱ्याच्या या चांदण्या
हिरव्या हिरव्या पानातून
लुकलूक गंधगोण्या

त्यांचं आभाळ धिटाचं
पाणी नसता पुरेसं
पोसतंय न सुकता
ताटव्यांच्या या थाटात

चांदण्या मोगऱ्याच्या
कळीदार शुभ्र होती
आणि अंगणाला माझ्या
चांदणवेळा देती

नाही कसलीच आस
मोगरीला पाहताच
सुरभीचे घडे टंच
मनवेली नाहतात

मोगरीचा सडा नाही
अलवार तो पडत
हातांनी त्या चांदण्यांना
खुडण्याची की गंमत

अंगणाचा हा सुवास
दरवळे कोस कोस
शरदाच्या चांदण्याचा
परिमळ भरघोस

जरा बसता शेजारी
ऐकू मोगरीची गाणी
पाकळीचे सूर होती
गन्ध आरोही कहाणी

जरा बसता शेजारी
कानी मोगरीची गाणी
मला डोहाळे फुलाचे
बीजफळ गंधवोनी

दि. १९/७/१९
सकाळी ७.२१ वा.



(७२)
## इच्छा दुर्दम्य

असता इच्छा दुर्दम्य
मार्ग निघती अगम्य
सुकली भूमी, टणक खडक
तरी रोप उगवेच कडक

वर वर दिसते रोप मृदू
इच्छा त्याची खडक खणू
पाणी कोठून आणायचे
उद्या कसे मी जगायचे

रडणे नाही, नाही कुथणे
चिंतेमध्ये उगा न डुबणे
ह्या क्षणाला, परिस्थितीला
नमवून डोके वर काढणे

बीज केवढे, केवढा जीव
नको तरीपण कुणाची कीव
हिंमत अंगची जागवायची
धरित्रीलाही फाकवायची

कोंबासाठी ती नरमेल
रुक्ष ढेकळे दूर करेल
असेच सहजी कशी करेल
आतून धक्का द्यावा लागेल

चिडेल, ओरडेल, वैतागेल
कोंबासाठी पण ऐकेल
थोडं थोडं टणकपण
दूर सारून त्या पोसेल

आत खोल खोल कणाकणात
ओलावा जपलेला मनात
बीज देऊन अंकुरेल
रोप स्नेहाने तरतरेल

डोंगर फाडून असेच येणे
पाझर दगडा फोडून जाणे
कुठले पाणी, कसे साचले
मन त्याचेही असते ओले

बस... ओलावा तो छुपलेला
जगापासुनी जो लपलेला
आपुलकीचे बीज अंकुरण्या
वसा मायेचा वसलेला

दि. २२/७/१९
रात्री १०.५१ वा.



## (७३)
## आभाळानं प्रेम दिलं

घट्ट मैत्री पाखरांची
प्रेम देती निखळ ती
मोह कशाचा आहे का
जागा फांदीवर छोटी

येवो ऊन वारा पाणी
सारे संगती मिळुनी
सख्य निभावती दृढ
मैत्री ठरते अजोड

चारा दिसता कुणाला
बोलावती मैतरांना
नाही हेवेदावे तिथं
चोचीत चारा देण्या

पाणी पिण्यासाठी बघा
कशी उडती आनंदे
सरोवरात पाहती
आपुल्याच प्रतिबिंबे

रंग रूप कोणा कसे
देवाजीने की दिधले
चोच, डोळे, पंख, पाय
कसे गोडुले निर्मिले

आवाजात त्याचे गाणे
कंठ मधुर सुरांचा
किलबिलताना पाहे
चिमणा गंधर्व होताना

आकाशाची ओढ पंखा
मनातली ताकदाहे
घालू गवसणी त्याला
जीव फुलूनिया जाये

मग उडून उडून
उंच उंच आभाळात
पुन्हा वसुंधरेपाशी
सारं मिळे गणगोत

दिसभर काय केलं
काय आभाळी पाहिलं
खाली धरती, वरून
आभाळानं प्रेम दिलं

थोडं सकाळचं उन्ह
झेलू अंगावर तान्हं
तान्ह्या पिलांसाठी
चारा आणू चोचीत भरून

वेडी पक्षीण ही माझी
जीव ओवाळत राही
प्रेम चोचीने चोचीला
मीही सांगताना पाही

भेट घरट्याबाहेर
झाडावर कुठेतरी
मैत्री आपुली अशी की
ओढ साऱ्यांना वाटावी

किती दिस इथं जिणं
कशा कशाला हे भिणं
क्षण घालवू निवांत
मैत्र भाग्यानं लाभणं

दि. २०/७/१९
रात्री १०.१५ वा.



## (७४)
## रानसृष्टी बोलणे

गगनचुंबी वृक्षराजी
पालवीने व्यापलेली
मार्ग धुतला नितळ झाला
वृष्टी त्यावर ओतलेली

आकाशाला गवसताना
तळ असावा स्वच्छ की
पारदर्शी मार्ग अथवा
भूमीतलही सावरी

हिरव्या हिरव्या रानी जातो
वारा कानी सांगतो
रथ कुणाचा मंद चाली
आज येथे चालतो

भूल पडते सृष्टीसाठी
गोडव्याचा सोहळा
वाट इथली सोडवेना
अन निवांत ह्या वेळा

मन जरासे बोलते ना
ते स्वतःशी डोलते ना
एकरूप होता जरासे
कळते सृष्टिमोल ना

एकट्याने जीवनाचा मार्ग
चालणे सुंदर
जगजनांच्या कोलाहली
व्यर्थ हेतू धूसर

चल पुन्हा स्वीकार पांथा
एकल्याने चालणे
ऐकशील मग तेव्हा तुही
रानसृष्टी बोलणे

दि. २३/७/१९
सकाळी ९.२६ वा.



## (७५)
## होऊन चित्तचोर

नाचतोच ना एकदा तरी मोर
प्रत्येकाच्या मनात अथवा
समोरच्याच्या मनात
होऊन चित्तचोर

कितीतरी पिसे अशीच गळतात
नकळत पाऊस येतो
एक मोरपीस हळूच कोणाच्या
गालावरून मलमल स्पर्शी फिरून जातं
आयुष्याचं गाणं सप्तरंगी
होऊन जातं

कुणा मुकुटी मोरपिसांच्या
रंगत जाती छटा अनोख्या
कधी कुणाच्या हृदयस्थळावर
ओसाड ऐशा भावस्थळीवर
एकाएकी धार बरसते
मेघ गर्जती वीज चमकते

एक नव्हे हो अनेक येती
दिलखुलास नाचण्यास मोर
मोर नाचता कधी कुणाच्या
भाग्यभूमीवर दैव बरसते

श्रीरंगाच्या मुकुटातुनी मग
सौभाग्याची पिसे डोलती
एक मोरपीस कृष्ण मुकुटी
एक राधेच्या चित्तकपाटी

एक आत्म्याच्या कधी न
उघडल्या ऐशा दुर्मिळ पेटी
एक संचित होऊन येते
जन्मोजन्मी माझ्या गाठी

एक भूतकाळ होऊन पाठी
एक भविष्याची रांगोळी गोरटी
एक डोळ्यातून सतत
झळकले प्रिया होऊन गोमटी

मोरपिसे ही ऋणानुबंध
हळुवार अशी सांगती

दि. २१/७/१९
दुपारी २.५७ वा.



## (७६)
## फुलं रंगभरात

फिक्या रंगांची शोभा निराळी
आकाशी नभ उतरून खाली
फुलाफुलांवर पसरून जाता
धरागगन घे नवी उमाळी

सोनपिवळे सोनेरी
सूर्यबिंब हो फूल पाकळी
सुवर्णकांती फुलराण्यांनी
साडी नेसली लिंबू पिवळी

मधे मधे ती शुभ्र पांढरी
फुले चमकती नभी चांदणी
साऱ्या रंगांमधून श्वेता
पांढुरके कोरून गोंदणी

फिकी जांभळी रंग नवाळी
आपुला तोरा गात वेगळी
तुऱ्यातुऱ्यातून डोलत राहते
नाजूक रंगांची रंगाळी

रंग केशरी ताजातवाना
आळवत राही गायनताना
फूलपाखरे येती मिचकवत
गोल गोल डोळे, पंखतराणा

फिके गुलाबी फूल ताटवे
गालावरती कुणी सांडले
अधरावरती रंग पसरूनी
लज्जेची पाकळी वाटते

मऊ मखमाली रंग पोपटी
पानापानामधुन फवारे
रंग वेगळे घेऊन संगे
झालेत रानवेडे वारे

रंगीत स्वप्ने किती दिसांची
फुललीत हाती घेऊन हात
पसरून मऊसर गालिचा इथं
नाजूक फुलं रंगभरात

दि. २३/७/१९
दुपारी १.४५ वा.



## (७७)
## देवांचे दिव्यत्व सापडे

दिवस उजडतो चैतन्याने
उठून ते साठवून घ्यावे
की अंथरुणात लोळत पडून
प्रकाश सोहळ्या गमवावे

भल्या पहाटे प्रसन्नतेचा
आकाशातून पडतो सडा
वेचून घेऊन शरीर मनाला
उत्साहाचा द्यावा धडा

किलबिल किलबिल चिमणी पाखरे
दैनंदिनी सुरू करती
इवल्या इवल्या कंठामधुनी
सृष्टीगीत ती गाती

नदी झुळझुळे आनंदाने
मार्ग पुढे चालते
सागरास भेटण्या अंतरा
प्रभातीस ती काटे

झाडेवेली ताज्यातवाण्या
झटकून अंगा होती
फळे फुले साऊली
देण्यास सरसावून येती

आकाशातून नानावर्ण
धरित्रीस स्पर्शती
इंद्रधनुचे रंग चांगले
रोज तिच्यावर बरसती

सृष्टी सारी जागी होऊन
कार्यास गती ती देते
आपण उठून तिला पाहता
मन उभारी घेते

झोपून नुसते स्वप्नं पाहता
कोण पुरे करणार
अंथरूनही झेलून तुम्हा
थकलेले असणार

प्रातःकाळी उठून मग
स्वप्नपूर्तीसाठी धावावे
कवेत चटकन येईल तुमच्या
त्याला प्रयत्ने गाठावे

उठता सकाळी आरोग्याची
साथ लाभे उत्तम
शरीर, मन दोन्हीही प्रसन्न
प्रेरित अंतर्मन

देवांचे दिव्यत्व सापडे
आकाशातून प्रभा
रोज उठू या ब्राह्ममुहूर्ती
ज्ञान मिळविते आभा

दि. २४/७/१९
दुपारी १२.३७ वा.



## (७८)
## पंखामधले बळ अनमोल

अनंत आकाशातून उडता
स्वच्छंदाची गोड मजा
आकांक्षांना पंखी भरता
विश्वपसारा दिसे खुजा

जरी गगनाशी नाते जडते
वसुंधरेचा मजसी लळा
दाणे टिपतो, पाणी चाखतो
आस्वादतो मी मधुर फळा

तिच्या कुशीतून उगवती झाडे
घरटे माझे फांदीवर
बाळ पिलु मज मुक्त बागडे
त्याच्या अंगा खांद्यावर

शुष्क काड्या अन गवतपात्या
चोचीमधुनी आणून
घरटे माझे सुंदर करतो
मनी भावना विणून

पिल्लू माझे जन्मा येते
घरट्याचीही सार्थकता
दाणा पाणी चोचीत देता
लाभे जीवाला की धन्यता

पिल्लू जेथे पक्षी तेथे
स्वर मधुर किलबिलण्याचा
पिल्लू आभाळी घेता भरारी
क्षण येतो गलबलण्याचा

मी फांदीवर समाधानाने
उंच भरारी त्याची पाहतो
इवल्याशा डोळ्यातून माझ्या
कृतार्थतेचा झरा वाहतो

धरती माझी माय होतसे
नभांगणाचा भव्य पिता
दोघांच्याही प्रेमरूपाने
कृपा निरंतर देई विधाता

चोच इवलीशी डोळे गोल
चिवचिव कूजन माझे बोल
जीव इवलासा उंच भरारी
पंखामधले बळ अनमोल

दि. २७/६/१९
सकाळी ८.३० वा.



## (७९)
## सृष्टीराधा

क्षितिजावरची लालिमा
सरोवरात बिंबिली
आकाशाने पहाटेला
हळूच धरणी चुंबिली

लाजली ती लाजली
क्षितिजापाशी थांबली
लाल लालेलाल गाल
पाण्यात लपवू लागली

धुऊन घेता जळामध्ये
कपोललाली उतरली
धरा अजूनच क्षितीजाच्या
कुशीत लपून बावरली

त्यातच बिंब नारायणाचे
प्राचीवरती अवतरले
निद्रेत गुंगल्या विश्वाला
प्रेम तयांचे हे कळले

अशा लाघवी प्रणयवेळा
रोज सकाळी धरणीला
निशा कुशीतून उठवत येतो
आभाळसखा बघ तरुणीला

ती बघते, उठते आपुलकीने
त्याचे स्वागत करण्याला
सृष्टी रंगते त्या दोघांच्या
रम्य गोमट्या मेलनाला

जाग जागला शुभ्र पतंग
शोधत हंसी राजहंस
तिच्या मीलना उत्सुक तो की
अशा वेळेला असीम दिगंत

झाडे जागली, पानोपानी
उत्फुल्ल तयांचे दिसती रंग
प्रतिबिंबाने दोन वाटती
सृष्टीराधा नभश्रीरंग

दि. २८/७/१९
दुपारी ३.२१ वा.



(८०)

## धरित्रीच्या की कुशीत

पावसाळी पेरणीला
नांगर खांद्यावर घेत
बैलजोडी हडकुळी
मुसक्या बांधून सोबत

दुष्काळाची आठवण
आताशी थोडा आला
पाऊस नेम नाही
आला म्हणत गडप झाला

तरी तयारी करावी
शेताची नांगरून
थोडे बियाणे टाकावे
धरित्रीच्या की कुशीत

तिची कूस ओलवावी
बीज डोकावे शेतात
चारा मिळो जनावरा
घास पडावा मुखात

आता चला रं गड्यांनो
बिगिबिगी शिवारात
रमू नका हिरव्या चारी
आला पाऊस भरात

दि. २८/७/१९
सकाळी ११.३४ वा.



## (८१)
## अंतरीच्या दर्पणात

चांदणशर्वरी
शीतकिरणे भूवरी
रम्य सरसतीरी
राधेसंग गिरीधारी

स्वच्छ शुभ्र नभांगण
आलं भराला चांदणं
नीलरंगी आकाशानं
राधारंग पांघरणं

सरोवर ते प्रसन्न
कुमुदिनी मोदमन
चंद्र पाही नभातून
तुझं माझं रे भेटणं

आली श्वेतहंस जोडी
जीवा शिवाची सांगडी
तुझ्यासवे मज गोडी
निरखती वेळा अजोडी

आज आपण वेगळे
असू जरी नेहमीचे
मांडीवर करा टेकू
तुझ्या पुढे राधा बसे

तुही हळुवार माझ्या
केशकुंतली रमला
सोनफुला माळताना
आरसाही ओशाळला

पाहण्यास दर्पणात
छवी गुंग तुझी माझी
मला दिसेनाच मी की
दिसे सावळा श्रीहरी

रूप तुझे निरखते
मजला मी विसरते
प्रेम असे हे कसे रे
जगताला मोहवते

विश्वाचा पोषक तू
राधा क्षुल्लक जीवजंतू
कसे प्राण गुंतले रे
तुझे माझ्या हृदयातु

राधा राधेची कधी ना
प्रेमभक्ती ही तुझी ना
अंतरीच्या दर्पणात
राधाश्याम एक हो ना

दि. २६/७/१९
सकाळी ८.१५ वा.



## (८२)
## ते भावनांची भाषा

बाग जांभळी गुलाबी
आकाश हे शराबी
निळ्याशार रंगातुनी
रंग पाझरे गुलाबी

गुलबक्षी गडद रंगा
फिक्या गुलाबी पाकळ्या
मिसळुनी रंग जाता
मोहात नभही पडता

पक्ष्यास झेप घेणे
वाटे किती सुहाने
पंखास पसरूनिया
रंगास भेट देणे

नीलवर्ण नीलाक्षी
अंबरास साजेशी
धरती गुलाबी वेडी
गुलकांती घेत वक्षी

रंग रंग नसती केवळ
ते भावनांची भाषा
नीलवर्ण मेघकृष्ण
राधाही सुमनवेशा

दि. २८/७/१९
रात्री ८.१७ वा.



## (८३)
## त्याची उषा गेली कुटं

झाडायेलींच्या हिरवाईत
सुर्व्या करतोया पाठलाग
त्याची उषा गेली कुटं
आला शोधायला लगोलग

झाली जागी कवाच पाखरं
करती भजन रामाच्या पारी
सुख घेऊन आलिया
उषा घरात आन दारी

व्हती पावसाची रात
भिजून गेलीया धरणी
तिला सुखविण्या आली
वर्षेसंगत उषाराणी

उन्हं पांघरून शेतं
आज झालीत सोन्याची
कोकिळाला आली हुक्की
रागदारी ती गाण्याची

रानफुलांचा गंध रानी
जाईसंग मोगरा अंगणी
भरला सुवास मनातुनी
उषा हितं सुर्व्या मागुनी

देखणं जोडपं पहायचं
खुशीत साऱ्यांनी नहायचं
सकाळी सकाळी ताजंतवानं
होऊन किरणा लेवायचं

दि. ४/८/१९
सकाळी ८.५४ वा.



## (८४)
## आभाळाची छाया

आभाळाची छाया अशी
शिरावर राहो
आरसा हा धरणीचा
नितळ नितळ आहो

जळी त्याचे प्रतिबिंब
मोहक वाटावे
अंधाराचे जाळे बघा
क्षणात फिटावे

काय काय उदरी त्याच्या
ब्रम्हांड सारे
चमचमत्या चांदण्या नि
ग्रह गोल तारे

मार्ग व्योम होत जाय
धरा स्वर्गाचा
पथिक खग येती उडत
ठाव मर्माचा

रंग किती सुंदरसे
छटांचे आंगण
केशरी, निळ्या, राजस
रंगांचे ते रिंगण
इंद्रधनू उमटते
जरासे लाजून
प्रेयसीस पाहते की
असे वाकून

उंच उंच शिखरे जाती
चुंबीण्यास त्याला
रम्य निसर्गाचं देणं
लाभलं आभाळाला

कृष्णमेघ दाटतात
जळ भरले जेव्हा
वर्षावाने सुखावते
धरणीमाय तेव्हा

मेघकांता विद्युलता
चमकते मधेच
आकाशात तेजरेख
लखलखते एक

सूर्य उगवतो नि
तेज पसरतो प्रकाश
गर्भात रात्रीच्याही तेथे
चंद्र देई साथ

रात्र पौर्णिमेची रसिक
वेडावून जाई
प्रियतमेच्या केसातून
चांद जाईजुई

चातक, चकोर सारे
नभा पाहताती
अर्घ्य कोणी इथून त्याला
श्रद्धे वाहताती

कोपावता मार्तंड तो
ताप झाकविण्या
मेघा आणून नभ
धरती दिलासण्या

प्रियजन सोडून जात
आकाशी चांदणी
आठवांनी अश्रू गळती
हृदय गोंदणी

आभाळ भरून येई कधी
झाकोळते सृष्टी
कधी नभा पाहताच
ओलावते दृष्टी

बाप आभाळचि होई
माय धरणी
विशाल हे मन करावे
स्वच्छ करणी

गगनाला साद दे
आकाश ठेंगणे
अनंत ईश्वराचे
तेची रूप सांगणे

कृष्ण सावळा नभात
पाहतात जे
आकाशगंगा त्यात
मुक्त वाहतात रे

क्षितिजावर मीलन
धरतीसवे कधी
रम्य सुंदराचे भास
तत्त्व अनादी

दि. २६/८/१९
सकाळी १०.११ वा.



## (८५)
## नीलांगणी प्रभाती

दिनकर नीलांगणी प्रभाती
नीलसागरी नौका
पाण्यावरती बिंब चकाके
त्यात हवेचा झोका

नीलमण्यांवर सुवर्णकण
हलकेच तरंगत येती
लाटांवरती सोनसळी
चांदण्या विहरत जाती

पाण्यावरती दिवे तरंगती
सूर्याने लावलेले
नीलवर्ण जलांगणी बघ
दीप असे तेवलेले

स्वर्गाचा दीप्तीमान खंड
आकाशातून पहातो
नभसागर अन सूर्यतेजाचा
मेळ अनोखा होतो

अशा क्षणाला नौकेमधून
बसून शांत तरावे
पंख लेऊनी आकांक्षेचे
खग होऊन विहरावे

सौंदर्याच्या सर्व कल्पना
इथे फिक्या पडती
नवपरिभाषा अर्था येऊन
लावण्ये झडती

तेजोगोलक सूर्य देखणा
आकाशाचा राणा
कांती प्रभेच्या लाटा उठती
त्यावर आरूढ व्हा ना.

दि. २९/७/१९
सायं. ५.५२ वा.



## (८६)
## तपोवनाचे पावित्र्य

मयुरबन हे किती देखणे
निवांत वावर दाणे टिपणे
निळी निळाई हिरवाईसंग
आकाशाला उतरू वाटणे

मोरपिसांची दुलई ओढून
जरा पहुडली धरा निवांतून
अशी शाटिका नेसून घ्यावी
मोरपिसांनी सजवून जावी

निर्जन निवांत रम्य वनातून
थवा तयांचा मुक्त बागडे
अजूनही ना उलगडू शकले
रंगसंगतीचे हे कोडे

मोर मयूरी नाचून दंग
पाऊस येता सृष्टीसंग
रूप देखणे पक्षीराज
डोक्यावरती तुऱ्याचा साज

फुले पिसारा आनंदाचा
डोलत डोलत मोर वावरे
शारदा करी वीणावादन
मोर सारखे तिथे पहावे

याच पिसांची होत लेखणी
ग्रंथसंपदा लिहिली जाते
केकारव तो वनात गुंजत
वनदेवी ही गायन करते

चित्र उमटते मनात कायम
चित्रकारही भाळून जाई
रंग जमवण्या कष्ट घेऊनी
स्पर्श मल्मली नजरेतून पाही

गळून जाती विकार सारे
शांतभावना विकसित होते
तपोवनाचे पावित्र्यही मग
हळूच नयनी विलसत जाते

मोर नाचू दे मनी सदोदित
आनंदाचे मेघ पाहू दे
वृष्टी मोदाची झेलून अंगी
जीवन मयूरबनची होऊ दे

दि. २६/८/१९
सकाळी ११.५४ वा.



## (८७)
## डोळे येतात भरू

गप्प बसून अश्रू गिळते
अजून काय करू
केवढ्याने खेकसतोस
डोळे येतात भरू

त्या हंसाच्या जोडीसारखी
जोडी असेल आपली वाटलं होतं
बरसण्यास तुझ्यावर मनातून
कितीदा आभाळ दाटलं होतं

इतकी साथ देऊनही
तुला मी कळलीच नाही
आरोप करून बदनाम करत
वृत्ती तुझी बदललीच नाही

मी कधी मी राहिलेच नव्हते
विरघळून कधीची तुझ्यासाठी गेले होते
तुझ्या पंखांची सावली
मिळेल म्हणून गप्प गप्पच राहिले होते

स्वप्न होतं माझं माझ्या
चिमुकल्या घरट्याचं
चिवचिव गोड गाणी गात
प्रेमाने ते बांधण्याचं

काही दिवसातच
काय झालंय तुला कळतंच नाही
सारे सगे सोयरे दिसतात तुला तुझे
मी मात्र दिसंतच नाही

एकटाच उडतोस, ऋतू झेलतोस
मी वाट पाहून थकून जाते
घरट्यात पिलं वाढवत
मी स्वतःला रमवून घेते

तू तुझ्या थव्यात मशगुल कायम
मी फांदीवर एकाकी रडते
असे कसे स्वप्न देवा
लगेच मोडून पडते

मनासारखा उडूनही
दोष मलाच देत असतोस
माझ्या आयुष्यात तू हव्या त्या
कोणत्याच क्षणी नसतोस

केवढ्याने ओरतोयस आजही
ओरड, आता मी थिजलेय
अश्रूंच्या ओघळात मी
कितीदा तरी भिजलेय

आजही पाहतीय मी
तीच हंसांची गोड जोडी
एकमेकांसाठी जगणंच काय
प्रसंगी जीवही सोडी

असं एकटेपण, असा साथी
नको देवा कोणाला
किती डागण्या, बोचण्या
मेलेल्या मनाला

दि. २१/८/१९
दुपारी ३.४७ वा.



## (८८)
## हिरव्या गवत पात्या

हिरव्या हिरव्या
गवत पात्या
दव पडताच
खुलती लवलवत्या

डोकावती मधूनच
रानफुले वेडी
गवताच्या सोहळ्याला
रंगारंग जोडी

कुठूनसा वेगळा
वेल डोके काढी
आपुल्या त्या पानांनी
धरणीला साडी

गुण्यागोविंदाने
उगवती सारे
श्रावणात फुलूनिया
फेर धरतारे

गाणी आनंदाची तुम्ही
दिसभर गाता
माणसाला वेगळाच
झुला झुलवता

हिरवी हिरवाई
डोळ्यास नवलाई
जवळून जाता
ताजी ताजी पर्वाई

दि. २१/९/१९
सकाळी ९.२७ वा.



## (८९)
## हुल्लड गाणी

गगनचुंबी बुचाची झाडे
उंच दांड्यांची शेलाटी फुले
आभाळी जाऊन पाहती खाली
धरणीला भेटाया उतावळलेली

गंधात विशाल नभसंदेश
धरित्री राणीला सांगण्या हौस
सडे पाडुनी तिला नाहवून
वेळी अवेळी सुरभी पाऊस

पंचपाकळ्या कोरीव फार
परागतंतूही पिवळेशार
पाकळ्या गाली गुलाबी लाली
फिकी पांढुरकी दांडीही खाली

एकसाथ कित्ती उमलून येती
झाडाला गुच्छ ते लगडून जाती
कळ्या दिसती क्षणात फुले
फांदीवर यांचे श्रावणझुले

पडले पडले वेचण्या घाई
पटापट ओंजळीतून बाई
झग्याच्या घोळात दडून बसून
कित्ती मिळाली आनंद होई

भराभर आता विणूया वेण्या
दोऱ्याविनाही गुंफून घेण्या
वेणीत वर फुलांची रांग
दांड्यांचे सुंदर कशीदाकाम

बुचाच्या वेण्या वेणीत खोवा
गंध दिसभर असा पसरावा
बालपणीची अल्लड मस्ती
बुचाची फुले होऊन साक्षी

आजही झाड मज आठवे
फुलांच्या गर्दीत मन विसावे
इवल्याशा वेणीत बुचाची वेणी
बालपणीची हुल्लड गाणी

दि. १/१०/१९
सकाळी ६.५० वा.



## (९०)
## सागाची दाटी

रानाच्या कुशीत
सागाची दाटी
आकाशी झेपावे
एवढी छाती

उंची उंची याची
गगना भेदी
लाकूड ऐसे
जीवन वेधी

घरादाराचे
आयुष्य दीर्घ
सागवान उभा
काळ प्रदीर्घ

रानात कोठे
निर्जन स्थळी
सागवानाची
भरात नवाळी

बहर फुलांचा
रजतकोशी
नाजूक कोणी
काढिली नक्षी

मोठमोठ्या
हिरव्या पानावर
फुलांचे तुरे
मुकुट ठरे

झाड सागाचे
वनसम्राट
कार्यही त्याचे
तसे विराट

फुले फुलती
कोण पाहती
लाजून अळुमाळू
एकांती राहती

साग बहरे
मोहोर अंगी
चांदीची चोळी
श्रीमंती सांगी

नटूनथटून
वनदेवी कीं
वाट पाहते
राजस राणी

फुलांचे अंग
कशिद्या संग
भरजरी शालू
सागाचा ढंग

जसा टिकतो
साग शतके
फुलांचा बहर
देख हटके

रानाचे सौंदर्य
सागफुले
जाळी जाळी
वाऱ्यासंग डुले

चला पाहू या
सागफुलांना
मदन हासवी
इथे कळ्यांना

सागवाना तू
फुलत राहावा
वंश वाढून
फळत राहावा

घरे आमुची
भक्कम करीशी
नाजूक फुलांचे
भविष्य होशी

दि. ३/१०/१९
रात्री ११.४३ वा.



## (९१)
## काय सांगावे नभाला रंग आले

काय सांगावे नभाला रंग आले
घुसळुनी स्वर्गातले क्षण संग आले
सांडला आहे खजिना हा कुबेरी
वितळुनी या कांचनाच्या रस रसेरी

तो आला तिकडून धावत श्याम वेडा
गर्द निळसर वर्णाचा आकाशी वेढा
एक मागून डोकवे तो रंग सुंदर
तांबडे की केशराचे अंग अंबर

शुभ्र रंगाला लपविती रंग सारे
जलदांचे धावणारे हो धुमारे
सांडले कुपीतून त्याच्या रंग का रे
कुंचल्याचे मारताना तो फटकारे

वाटते जणू युद्ध सुरू हे झाले का रे
एकमेकांवर ढगांचे मारा भाले
रंग विजयी रंग हरल्या भावनांचे
आपुले हे युद्ध चाले स्पंदनांचेल

ही निशा उदयास येता तम पसरतो
सूर्य वेडा तेज आपुले कुठे विसरतो
संधिकाळी संधी साधून सांज येते
जीवनाचे रंग पाहून धुंद होते

दि. ०२/०९/२०२२
सायं. ०७.३० वा.



## (९२)
## असे सौंदर्या टिपावे

फेकफेकते हे नभ
रंग सोनेरी केशरी
येते दौडत सकाळ
कशी गोजिरी हासरी

तिचा ठरलेला असे
दिनक्रम सुंदरसा
रूप न्याहळत बसे
होत स्वतःचा आरसा

कधी या रंगाची साडी
कधी त्या रंगाचा शालू
सांजवेळ होपावेतो
रूप निखरे लाजाळू

कधी मेघ माळलेले
जल देणारे हो काळे
कधी तडिता चमके
विणकाम न्यारे चाले

कधी स्वच्छसे पातळ
शुभ्र निरभ्र पांघरे
फिके रंग पायघड्या
सूर्य त्यावरती फिरे

काढे नाजुक कशिदा
अवकाश लाभताना
रोज शृंगार चालतो
दिनराणी लाजताना

असे सौंदर्या टिपावे
नजरेत साठताना
जरीकाठ इंद्रधनू
क्षणभरे गोठताना

दि. १६/०९/२०२२
सकाळी ०८.०२ वा.



## (९३)
## सोनभविष्य प्रकाशी

सोनउन्हांचा दसरा
रोज रोज लुटायाचा
तेज स्वर्गातले घेत
तम सारा फिटायाचा

सोनपिवळ्या उन्हात
सोनसळी आशा जागे
उषा येते हळुवार
तिची आभा सोनं फेके

सोनसोनुल्या कामना
ताज्यातवाण्या होऊन
रोज रोज पोसतात
अंगी बाळसं धरून

सोनपाखरांची नीज
सोनजळातले नभ
सोनपांघरून घेत
चकाकून जाई दव

रोज नव्या जगण्याची
पिटे दवंडी आकाशी
सोनआवाजाचे सूर
सोनभविष्य प्रकाशी

दि. १४/१०/२०२२
सकाळी १०.१७ वा.



## (९४)
## आकाशीच्या निळाईने

आकाशीच्या निळाईने
सागराची खोली प्याली
प्रतिबिंबाची साजिरी
निळी साडी भूमी ल्याली

आकाशीच्या निळाईने
हृदयात जागा केली
एक विशाल नीलिमा
आसमंता भरू गेली

आकाशीच्या निळाईने
नीज निळी निळी झाली
स्वप्नं निळेशार होता
खुशी निळी होत आली

आकाशीच्या निळाईने
वृंदावनी रास झाली
गोकुळात सुख आले
वेदना जणु निमाली

आकाशीच्या निळाईने
गोरी राधा निळी झाली
कृष्ण बावरून गेला
जादू अशी निळी झाली
आकाशीच्या निळाईने...

दि. १३/१०/२०२२
सकाळी ०९.३२ वा.



## (९५)
## आता तुला पटले ना

आज नभ फेसाळले
किती किती उसळले
असे काय घडे बरं
चक्क उतू उतू गेले

रूप उतावळे त्याचे
रागरागावून गेले
सागराच्या मनी धस्स
अचानक काय झाले

झाला शांत तो समुद्र
लाटा आकाशात गेल्या
रुद्र रुपात नाचून
राग व्यक्त करू गेल्या

गेल्या ढगात बसून
ढग उमडून आले
असे अक्राळविक्राळ
एक युद्ध जणू चाले

सांग रोज खवळशी
भरतीने नाचतोस
मन भेदरले कधी
तरी का रे वाचतोस

तुला उसळणे येते
कसा भयानक दिसे
आज आकाशाच्या काची
रूप तुझे तुला हसे

असा वाईट दिसशी
नको होणे रे बेभान
जरा शांत नि निवांत
सांभाळावे तू इमान

रूप पाहता स्वतःचे
भयानक वाटले ना
नको भेडसावू जना
आता तुला पटले ना

दि. १५/११/२०२२
सकाळी ०८.१८ वा.



## (९६)
## स्वर्ग वेगळा कुणी पाहिला

अद्भुत सुंदर दृश्य केवढे
फिटे पारणे डोळ्यांचे
जळात नभ अन नभात सोने
सूर्य टाकतो किरणांचे

डोंगर माथ्यावरी टेकल्या
गर्द काळसर ढग पडद्याला
सारून बाजू दिनमनी डोकवे
स्वर्णशलाका पाडण्याला

काय देखणे चित्र वाटते
पर्वत रांगा करड्या छान
वाळुकेत रेघांची नक्षी
पोत मुलायम मऊसर खाण

बिंब जळातील खुलले आहे
तेज फाकले सोनेरी
तोयातील गर्दी मेघांची
करड्या काही चंदेरी

सृष्टीचे लावण्य अनुपम
जरा तिच्या समवेत रहा
स्वर्ग वेगळा कुणी पाहिला
इथेच तो अनुभवुनी घ्या

दि. १५/११/२०२२
सकाळी ०८.३६ वा.



## (९७)
## जुळले धागे जुळल्या तारा

भरून आल्या आभाळाच्या
मनात काही
मनात भरले आभाळही मज
प्रिये तू पाही

दाटदाटुनी ढग हे भरले
कोसळण्यासाठी
हृदय तुडुंबही माझे राणी
तुज प्रीत देण्यासाठी

हात हाती घेऊन तुझा
आश्वस्त किती झालो
किती दिसांनी प्रियतमे आपण
असे जवळी आलो

उंच नभाशी पोचल्या आशा
आपुल्या सहजीवनाच्या
जुळले धागे जुळल्या तारा
दोन प्रेमी जीवांच्या

जगण्यासाठी औषध तू मज
रहा सदा संगती
तुला पाहता विसरून सारे
चालतो सप्तपदी

तुझ्याविना मी अपूर्ण आहे
घे इतुके जाणुनी
प्रिये लाडके जीव ओवाळीन
तुज पायी स्वर्ग आणुनी

एकरूप होऊन जाऊ चल
सुंदर नाते जपू या
परस्परांच्या प्रेमसुखातच
भारले जीवन जगू या

दि. १६/११/२०२२
सकाळी ९.४५ वा.



## (९८)
## दान मिळेल नभाचे

ऋतू अंथरला ऋतू मंतरला
रंग कोणते कसे
मनी मदनाचा फुले पिसारा
मधुमास हा वसे

पानोपानी रंग वेगळे
तो सांडून देतो ना
झाडे वेली रम्य सुगंधही
तो मांडून देतो ना

वारे गंधित हलके हलके
उडतील अवकाशी
तशा मीलनाच्या या आशा
फुलती परागाशी

रंग गुलाबी गेले पसरून
गुलाबी तरुतळ सारे
मखमल गेली पसरून पदतळी
पसरले शीतल तारे

इथे घालवला एक जरी क्षण
सार्थक युगायुगाचे
प्रीत पडेल जी पदरी मोहून
दान मिळेल नभाचे

दि. २०/०३/२०२३
सकाळी ०८.५७ वा.



## (९९)
## बंध त्याचे जोडलेले

कुंचला फिरला पहाटे
चित्रकाराचा जरा
उजळुनी प्राची दिशा
रंग वसन भरजरा

मिसळुनी रंगात सारे
रंग नाचू लागले
आज तेही गात वेडे
फेर घुमूही लागले

हा आला बघ रंग केशरी
पिवळाधमक अन तांबडाही
एक गुलाबी रंग त्यातच
मिसळुनी जाय अंबरी

आकाशी रंगाने थोडे
काढले की डोके वर
मोरपिशी मग रंग बसला
सजुनिया त्याच्याच वर

पांढऱ्या मोतीया रंगा
आज शोभा चांगली
सावळ्या हरीनेही आपुली
कृष्ण प्रभा मग टांगली

जांभळ्या रंगात न्हाऊन
कुंचल्याचा फटकारा
आभाळ दालन रंगारंगी
मेघमालेवर शहारा

हात ना दिसती तयाचे
चित्रकारही गूढ हा
नानारंगी रंगलेला
सृष्टीकारही मूढ हा

रंग ते स्वर्गातले का
असती केव्हा न्यून की
उतरुनी नभ अंगणी तो
निरखतो भुई सुंदरी

बंध त्याचे जोडलेले
रोज ये कृती घेऊनी
दाद देतेही धरा तो
चित्र रेखी स्व लपवुनी

गुप्त स्वतः राहुनी
कृती मांडतो आपुल्या पुढे
कार्य कारण भाव जाणून
क्षणक्षणा प्रचीती घडे

दि. १९/११/१९
सकाळी १०.५४ वा.



## (१००)
## अन पंखातून उमेद भरता

ही भरारी नजर करारी
अदा ही माझी उडण्याची
या पसरल्या पंखातुन मज
कवेत सारे भरण्याची

रंग कोणते आकाशाचे
निळ्या पांढऱ्या शांत छटेचे
चोच इवलुशी टोकदार ती
खेळ सावजा टिपण्याचे

उडता उडता फांदीवरती
क्षणभर टेकून बघतो मी
आकाशाच्या अथांगतेला
पंखामधुनी मोजतो मी

या धरतीने लेकुरापरी
मायेने मज वाढविले
अंगाखांद्यावरी खेळवून
प्रेमभराने लाडविले

आकाशाने दिली केवढी
अनंत मजला स्वप्ने अशी
अन पंखातून उमेद भरता
नवीच दृष्टी मिळते जशी

मजला लाभले सौंदर्याचे
रूप देखणे खग अनुपम
जगण्याचे हे माझे मोहक
तंत्र भुलवीते मानवजन

असाच उडूनी पुन्हा धरेवर
निवांत बसुनी घेईन श्वास
सदा टेकणे मायभूमीवर
उडण्याची जरी अंतरी आस

तिच्याच आकांक्षांचे भरते
भरुनी पंखी या मी विहरी
मनात माझ्या कृतज्ञतेने
तिच्यासाठी उठती लहरी

हे मायभू तुझे पांग फेडणे
अशक्य असते जन्मभरी
केवळ मी तर तुझ्या वत्सली
विनम्र राहो वरचेवरी

दि. २६/०८/२१
सकाळी ०७.४४ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक – संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर – ४०० ००५

  ई–मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २0२0 प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६0 पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २000 पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले), सुरभी (फुले), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (सकाळ-संध्याकाळ) - लाघव वेळा, (वेळा) - तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, (धरती-आकाश) - नभ मोजताना, (जीवनपर) - मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) -प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utmsource=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम –<br>"सर्ग_निसर्ग" ऑडिओ<br>अल्बम – "मंजुमंजिरी" | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of<br>100th Episode of<br>Mann Ki Baat from<br>Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ६७
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ३६
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •